कृषीवल
रायगड, बुधवार, दि. १ एप्रिल २०२६
किंमत ४ ₹

## मुरुडमध्ये लाचखोर कनिष्ठ अभियंत्याला बेड्या

**आगरदांडा :** सार्वजनिक बांधकाम विभाग, मुरुड येथे कार्यरत असलेल्या कनिष्ठ अभियंता श्रद्धा दिलीप बोऱ्हाडे यांना २ लाख ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) पथकाने रंगेहात पकडले. या कारवाईमुळे शासकीय कार्यालयांमध्ये खळबळ उडाली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, एका ठेकेदाराने मुरुड परिसरातील एकदरा, राजपुरी आणि खोकरी या गावांमध्ये रस्त्यालगत स्लॅब ड्रेनचे काम पूर्ण केले होते. या कामाचे बिल आणि अंदाजपत्रक मंजूर करून देण्यासाठी कनिष्ठ अभियंता बोऱ्हाडे यांनी संबंधित ठेकेदाराकडे सुरुवातीला •➤ पान २ वर

B.com Computer
रिसेप्शनिस्ट महिला पाहिजे. अनुभवाची अट नाही. वेटर/रुमबॉय व महिला पाहिजेत. अर्जासह भेटा.
साई-इन रिसॉर्ट चोंढी, अलिबाग-रेवस रोड अलिबाग

### वे|ध|क

## पोटनिवडणूक बिनविरोध नाही

**बारामती :** अजित पवार यांच्या निधनानंतर बारामती विधानसभेची जागा रिक्त झाली आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाने या जागेसाठी पोटनिवडणुकीची घोषणा केली आहे. राज्यातील बारामती आणि राहुरी विधानसभेसाठी होणाऱ्या पोटनिवडणुकीसाठी २३ एप्रिलला मतदान होणार असून, ४ मे रोजी मतमोजणी होणार आहे. बारामती विधानसभेची पोटनिवडणूक बिनविरोध करण्याचे प्रयत्न सुरू असताना आता ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी बारामतीत उमेदवार देणार असल्याची माहिती दिली आहे. बारामती विधानसभा पोटनिवडणुकीबाबत बोलताना लक्ष्मण हाके यांनी म्हटले की, आम्ही बारामती विधानसभा पोटनिवडणूक लढणार आहोत. अनेक पक्ष आमच्या संपर्कात आहेत.

## जवानाचा संशयास्पद मृत्यू

**पोलादपूर :** केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ) मधील जवान प्रशांत प्रकाश कदम (४२) यांचा ड्युटीवर परतताना संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. पोलादपूर तालुका येथील कणगुले हे त्यांचे मूळ गाव असून, सध्या ते तळेगाव दाभाडे येथे वास्तव्यास होते. २७ मार्च रोजी गुजरातमधील गांधीनगर येथे ड्युटीसाठी निघाल्यानंतर लोणावळ्यापर्यंत पोहोचल्याची माहिती त्यांनी कुटुंबियांना दिली होती. त्यानंतर त्यांचा संपर्क तुटला. पुढील तीन दिवसांनी कर्जत तालुका परिसरातील सोमाटणे फाटा येथे ते जखमी अवस्थेत आढळले असून, रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्यांना मृत घोषित करण्यात आले. मृत्यू अपघाती •➤ पान २ वर

## अशोक खरात प्रकरणात
# तटकरे खोलात?

- चाकणरांसोबत भागीदारी असलेल्या आकाश चौधरीसोबत गुंतवणूक पडणार महागात?
- शिवसेना ठाकरे पक्षाच्या नेत्या सुषमा अंधारेंनी केला गौप्यस्फोट



**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

**नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाच्या तपासात दिवसेंदिवस नवे धक्कादायक तपशील समोर येत असून, या प्रकरणाला आता राजकीय व आर्थिक वळण लागल्याचे चित्र समोर आले आहे. यादरम्यानच मंगळवारी शिवसेना ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी पत्रकार परिषदेत रुपाली चाकणकर, तटकरे आणि चौधरी यांच्यातील कथित आर्थिक संबंधांवरून गंभीर आरोप केले आहेत. त्यामुळे तटकरे अडचणीत सापडले असल्याचे बोलले जात आहे.**

सुषमा अंधारे यांनी दावा केला की, रुपाली चाकणकर यांचे पती निलेश चाकणकर आणि चौधरी नावाच्या व्यक्तीची कर्मा कन्स्ट्रक्शन नावाच्या कंपनीत भागीदारी आहे. हे चौधरी नाव महत्त्वाचे आहे, कारण ते तटकरे (अदिती तटकरे व अनिकेत तटकरे यांच्या संदर्भात) यांच्यासोबत अनेक कंपन्यांमध्ये भागीदार असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. यावरून अंधारे यांनी 'यह रिश्ता क्या कहलाता है?' असे समीकरण मांडले आहे. म्हणजेच, चौधरी हे तटकरेंचे भागीदार आहेत आणि तेच चौधरी चाकणकरांचेही भागीदार आहेत. या पार्श्वभूमीवर अंधारे यांनी हा नेमका संबंध काय? असा सवाल उपस्थित करत या तिघांमधील आर्थिक नातेसंबंधांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. •➤ पान २ वर

### हा फक्त योगायोग?

आकाश चौधरी आणि आदिती तटकरे यांची भागीदारी असलेल्या या तीन कंपन्यांची नावे आणि अनिकेत तटकरे व पत्नी वेदांती तटकरे यांच्या एकूण कंपन्यांपैकी तीन कंपन्यांची नावे ही थोडासा बदल करुन सारखीच असल्याचे समोर आले आहे.

| आकाश चौधरी व आदिती तटकरे यांची भागीदारी असलेल्या कंपन्या | | अनिकेत तटकरेंची भागीदारी असलेल्या एकूण कंपन्यांपैकी या महत्त्वाच्या कंपन्या |
| --- | --- | --- |
| मल्टिव्हेंचर इस्टेट प्रा.लि. | ⟷ | मल्टिव्हेंचर प्रॉपर्टीज् प्रा.लि. |
| गीतांमृत ॲग्रो इस्टेट प्रा.लि. | ⟷ | गीतांमृत डेअरी प्रा.लि. |
| स्वर्गांमृत ॲग्रो इस्टेट प्रा.लि. | ⟷ | स्वर्गांमृत डेअरी प्रा.लि. |

### खरातच्या मुलाला अटक; पत्नी फरार

**नाशिक :** राज्यात गाजत असलेल्या अशोक खरात प्रकरणात नवे वळण आले असून, मंगळवारी सायंकाळी एसआयटीच्या पथकाने खरातच्या घरातून मुलगा हर्षवर्धनला ताब्यात घेतले आहे. त्याला चौकशीसाठी महाराष्ट्र पोलीस अकादमी याठिकाणी आणण्यात आले आहे. मुलगा हर्षवर्धनपाठोपाठ खरातची पत्नी कल्पना खरात हिलादेखील लवकरच अटक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शिर्डी येथील जमीन खरेदी फसवणूक प्रकरणात अशोक खरात, त्याची पत्नी आणि इतर मिळून पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात पोलिसांनी अरविंद बावके आणि किरण सोनवणे या दोघांना अटक केली असून, न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, मुख्य आरोपी अशोक खरात हा आधीच न्यायालयीन कोठडीत असून, त्याची कसून चौकशी सुरू आहे. या प्रकरणाचा तपास विशेष तपास पथकाकडून सुरू असून, आणखी काही धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, मंगळवारी एसआयटीकडून खरातची पाच तास चौकशी करण्यात आली.

### आकाश चौधरी आणि आदिती तटकरे यांची भागीदारी?

**शिवसेना ठाकरे पक्षाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी दिलेल्या माहितीनुसार, मल्टिव्हेंचर इस्टेट प्रा.लि., गीतांमृत ॲग्रो इस्टेट प्रा.लि, स्वर्गांमृत ॲग्रो इस्टेट प्रा.लि. या तीन कंपन्यांमध्ये आकाश चौधरी व आदिती तटकरे यांची भागीदारी असल्याचे समोर आले आहे. आता या कंपन्यांची सध्याची नेमकी परिस्थिती काय, हे चौकशीतूनच समोर येईल, असेही अंधारे यांनी म्हटले आहे. अधिक माहिती घेतली असता या तीनही कंपन्यांमध्ये आकाश चौधरी यांनी ५ फेब्रुवारी २०१८ रोजी डायरेक्टर पदाचा कार्यभार स्वीकारला, तर १२ डिसेंबर २०२२ रोजी पदाचा राजीनामा दिल्याचे समोर आले आहे.**

### धागेदोरे जोडले, सत्य अजूनही पडद्याआड!

खरात प्रकरणात एकामागून एक कनेक्शन उघड होत असताना, मोठ्या नावांची साखळी समोर येऊ लागली आहे. भागीदारी, कोट्यवधींचे व्यवहार आणि संशयित आर्थिक जाळं यामुळे प्रकरण अधिकच गडद होत आहे. मात्र, इतक्या धाग्यांनंतरही सत्यावर अजूनही पडदा असून, "नेमकं कोण कुणाशी जोडलेलं?" हा सवाल अनुत्तरीतच आहे. चौकशीशिवाय हा गुंता सुटणार नाही, हे स्पष्ट होत आहे.

# वढाव बहिरी देवाची यात्रा

## श्रद्धा, परंपरा आणि उत्साहाचा संगम



**। पेण । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील वढाव गावचे ग्रामदैवत बहीरीदेवाची यात्रा मंगळवारी संपन्न झाली. निवडूंग प्रजातीतील काटेरी झाड असलेले पेरकुट अंगावर मारण्याची अनोखी प्रथा येथे आहे. या यात्रेसाठी मुंबई, ठाणे, पुणे, कोकणासह महाराष्ट्रातून मोठ्या संख्येत भाविक या यात्रेसाठी वढाव गावात येतात. काटेरी पेटकुट अंगावर मारूनदेखील भक्तांना काही होत नाही. रक्तबंबाळ अवस्थेत भाविक बेधुंद नाचतात, ही प्रथा पाहण्यासाठी हजारो नागरिकदेखील येथे येतात.

चैत्र महिन्याची चाहूल लागली की, पेण तालुका परिसरात ग्रामदैवतांच्या यात्रांना सुरुवात होते. या यात्रा म्हणजे ग्रामीण जीवनातील परंपरा, श्रद्धा आणि सामूहिक संस्कृतीचे जिवंत दर्शन घडवणारा उत्सव असतो. अशाच वैशिष्ट्यपूर्ण यात्रांपैकी एक म्हणजे वढाव बहिरी देवाची यात्रा होय.

या यात्रेचे खास वैशिष्ट्य म्हणजे, बहिरी देवाचा 'छबिना' डोक्यावर घेऊन नाचवण्याची परंपरा. ढोल-ताशांच्या गजरात हा छबिना संपूर्ण पंचक्रोशीत फिरवला जातो. या सोहळ्यात गावकऱ्यांचा •➤ पान २ वर

## अलिबागमध्ये व्यावसायिकाने जीवन संपविले

### कर्जबाजारी झाल्याने गळफास घेऊन आत्महत्या

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबागमधील स्पेअर पार्ट्सच्या प्रसिद्ध व्यावसायिकाने स्वतःचे जीवन संपविले. कर्जबाजारी झाल्याने त्याने त्याच्या दुकानातच दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना मंगळवारी (दि.३१) दुपारी रायवाडीजवळ घडली.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दिनेश कुसाळकर (४२) असे या मृत व्यावसायिकाचे नाव आहे. हा मूळचा अलिबाग तालुक्यातील खंडाळे येथील रहिवासी आहे. सध्या चेंढरे येथे राहात होता. चेंढरेपासून काही अंतरावर रायवाडी परिसरात त्याचे गाड्यांच्या स्पेअर पार्ट्सचे दुकान आहे. एक नामवंत व्यावसायिक म्हणून त्यांची ख्याती होती. मागील काही महिन्यांपूर्वी त्यांच्या दुकानाला आग लागली होती. या आगीत दुकानातील लाखोंचा ऐवज जळून गेल्याने त्यांची मोठी वित्तहानी झाली होती. या नुकसानीतून सावरण्याचा त्यांनी प्रयत्न केला. तरीदेखील कर्जाचे डोंगर त्यांच्या डोक्यावर होता. मंगळवारी (दि.३१) दुपारी नेहमीप्रमाणे ते त्यांच्या दुकानात गेले. दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास दुकानात असताना कामगाराला जेवून येण्यास सांगितले. त्यावेळी ते एकटेच होते. दरम्यान, त्यांनी दुकानातील छताला दोरीने लटकवून गळफास घेतला. ही बाब दुकानाच्या बाजूला असलेल्या दिनेश गॅरेजमधील •➤ पान २ वर

## दहा आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यातील प्रशासनामध्ये मोठे फेरबदल करण्यात आले असून, दहा बड्या आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले आहेत. त्यामध्ये मुख्यमंत्र्यांच्या अतिरिक्त मुख्य सचिव अश्विनी भिडे यांची मुंबई महापालिकेच्या आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर धडाडीचे आयएएस अधिकारी अशी ओळख असलेले तुकाराम मुंढे यांची दिव्यांग विभागातून राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन, पुनर्वसन व मदत कार्य विभागात बदली करण्यात आली आहे.

राज्य सरकारने ३१ मार्च रोजी १० आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्याचे आदेश दिले आहेत. तुकाराम मुंढे यांनी दिव्यांग कल्याण विभागात काम करत •➤ पान २ वर

## चौघे जण वर्षभरासाठी जिल्ह्यातून तडीपार

**रोहा :** रोहा तालुका, मुरुड आणि रेवदंडा परिसरात अवैध गावठी हातभट्टी दारू निर्मिती व विक्रीप्रकरणी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या चौघांवर पोलिसांनी तडीपाराची कारवाई केली आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. रायगड पोलीस यांच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. रोहा पोलीस निरीक्षकांकडून सादर करण्यात आलेल्या अहवालाच्या आधारे संबंधित आरोपींना जिल्ह्यातून एका वर्षासाठी हद्दपार करण्यात आले आहे. तडीपार करण्यात आलेल्यांमध्ये टिटवी-सावरोल परिसरातील काशिनाथ •➤ पान २ वर

## आरोग्यसेवकांना नियुक्तीपत्र

### सरळसेवा भरती अंतर्गत १३ उमेदवारांची निवड



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेच्या अंतर्गत येणाऱ्या आरोग्य विभागात मनुष्यबळाचा प्रश्न कायमच आहे. अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे ग्रामीण भागात सेवा देताना आरोग्य विभागाला तारेवरची कसरत करावी लागत आहे. आता मात्र जिल्ह्यातील आरोग्य सेवेबाबत आशावादी चित्र समोर येण्याची शक्यता आहे. सरळसेवा भरती अंतर्गत १३ जणांची निवड करण्यात आली असून, या आरोग्य सेवकांना नियुक्तीपत्र देण्यात आले आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.

सरळसेवा भरती सन २०२३-२४ अंतर्गत जिल्हा निवड मंडळाने मंजुरी दिलेल्या आरोग्य सेवक (पुरुष) ४० टक्के व आरोग्य सेवक (पुरुष) ५० टक्के संवर्गातील अतिरिक्त अंतिम निवडसूचीमधून एकूण १३ उमदेवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले. वैभव डोंगरे यांना उपकेंद्र मजगाव-माणगाव, श्रीकृष्णा वाईकर यांना उपकेंद्र हमरापूर-पेण, •➤ पान २ वर

## नवी मुंबईचा ६,७०४ कोटींचा फुगीर अर्थसंकल्प

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई महापालिकेने २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी तब्बल ६ हजार ७०४ कोटी रुपयांचा फुगीर अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी महापालिका सुमारे ४०० कोटी रुपयांचे कर्जरोखे काढणार आहे. महापालिकेची स्थापना झाल्यानंतर २५ वर्षांपासून सुरू असलेली परंपरा खंडीत करीत यंदाचा अर्थसंकल्प प्रशासनाऐवजी स्थायी समितीने तयार करून तो स्थायी समितीचे सभापती अशोक पाटील यांनी महासभेत मांडला. या अर्थसंकल्पात शहरातील वाहतूक कोंडी फोडण्यावर आणि महापालिकेचा कारभार पेपरलेस करण्यावर स्थायी समितीने विशेष भर दिला आहे.

नवी मुंबई महापालिकेची स्थापना झाल्यापासून अर्थसंकल्प हा प्रशासनाच्या माध्यमातून तयार झाल्यानंतर तो महापालिका आयुक्तांच्या माध्यमातून स्थायी समितीमध्ये सादर केला जात होता. मात्र सभागृहनेते सागर नाईक यांनी या परंपरेला छेद दिला. त्यामुळे आयुक्तांनी यंदा फक्त खर्चाचे अंदाजपत्रक स्थायी •➤ पान २ वर

### पामबिच मार्गावर उभे राहणार उड्डाणपूल

पामबिच मार्गाला नवी मुंबईचा क्विन नेकलेस म्हणून ओळखले जाते. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू झाल्यानंतर या मार्गावर वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या विमानतळावरून आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू झाल्यानंतर पामबिच मार्गावर वाहतूक कोंडी होणार आहे. ही वाहतूक कोंडी फोडण्यासाठी या मार्गावर उड्डाणपूल उभा करण्याचे नियोजन स्थायी समितीने केले असून त्यासाठी ४०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

### ठोक मानधन, कंत्राटी कर्मचाऱ्यांचा पगार वाढणार

नवी मुंबई महापालिकेत मोठ्या प्रमाणात कर्मचारी ठोक मानधनावर काम करतात. पालिका शाळांमध्ये ज्ञानदानाचे काम करणारे शिक्षकही हंगामी पध्दतीवर आहेत. सफाई आणि गार्डनमध्ये काम करणारे कामगार हे अनेक वर्षांपासून ठेकेदारी पध्दतीने काम करीत आा-हेत. त्यांच्या पगारात वाढ करण्याची तरतूदही या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

## पोलादपुरात अवकाळी पाऊस




**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

पोलादपूर तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून वाढत्या उष्णतेचा सामना नागरिकांना करावा लागत असतानाच सोमवारी दुपारनंतर लहुळसे गाव आणि परिसरात अवकाळी वादळी पावसाने हजेरी लावली.

देवळे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील निसर्गरम्य लहुळसे परिसरात अलीकडील काही वर्षांत ग्रामीण पर्यटनाला चालना मिळत आहे. मात्र, गेल्या चार-पाच दिवसांत या भागात प्रचंड उष्मा जाणवत होता. अशा परिस्थितीत सोमवारी (दि. ३०) दुपारनंतर •➤ पान २ वर

### शासनाची भरपाई कागदावरच | आश्वासनांच्या फेऱ्यात अडकला बागायतदार

# रायगडात 'हापूस' संकटात

सलीम शेख
**। माणगाव ।**

कोकणाला लाभलेले निसर्गाचे वरदान म्हणून ओळखला जाणारा 'फळांचा राजा' हापूस आंबा यंदा अभूतपूर्व संकटात सापडला आहे. देश-विदेशात मोठी मागणी असलेल्या या आंब्याच्या हंगामाकडे दरवर्षी उत्सुकतेने पाहिले जाते; मात्र यंदा बदलत्या हवामानामुळे आंबा व काजू या दोन्ही नगदी पिकांचे अक्षरशः कंबरडे मोडले आहे. उत्पादनात तब्बल ९० टक्क्योपर्यंत घट झाल्याचे चित्र असून, उर्वरित पिकावरही रोग व अवकाळी पावसाचे सावट कायम उभे ठाकले आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील बागायतदार शेतकरी पुरता संकटात सापडला आहे.



यंदाच्या हंगामात हवामानाने अक्षरशः लपंडाव खेळला आहे. पाऊस उशिरा थांबला तसेच थंडी उशिरा सुरू झाली, मध्येच तापमानात अचानक वाढ या चढ-उतारामुळे डिसेंबरमध्ये यायला हवा असलेला आंब्याचा मोहोर उशिरा आला. जानेवारीत थंडीचा परिणाम दिसला; मात्र त्यानंतर अचानक तापमान वाढल्याने मोहर गळून पडला. परिणामी, उत्पादनावर मोठा परिणाम झाला. रायगड जिल्ह्यातील माणगाव, तळा, मुरुड, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, कोल्हापूर व अलिबाग येथे बहुतांश भागात सुरुवातीला •➤ पान २ वर

> यंदा नैसर्गिक आपत्तीमुळे संपूर्ण कोकणासह रायगड जिल्ह्यातील आंबा फळपीक उत्पादकांचे मोठे नुकसान झाले आहे, याची शासनाला पूर्ण जाणीव आहे. नुकसानग्रस्त बागायतदारांचे सर्वे क्षण तातडीने पूर्ण करण्याच्या प्रशासनाला सूचना दिल्या असून, नुकसानीचा अहवाल आल्यानंतर त्या विषयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून योग्य ती नुकसान भरपाई निश्चित केली जाईल.
> – भरत गोगावले, फलोत्पादन मंत्री

## पीएनपीच्या विद्यार्थिनी राज्यात अव्वल

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील पीएनपी होली चाईल्ड सी.बी.एस.ई. वेश्वी स्कूलमधील विद्यार्थिनी इंडियन टॅलेंट ओलिंपियाड (Indian Talent Olympiad) (ITO) इंग्रजी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या नावलौकिकात भर घातली आहे.

इयत्ता तिसरीतील सान्वी पटेल हिने दुसऱ्या फेरीत राज्यस्तरावर पाचवा क्रमांक पटकावत उल्लेखनीय कामगिरी केली, तर इयत्ता पहिलीतील वीरा फार्णे हिने तिसरा क्रमांक मिळवून राज्यात आपले स्थान निर्माण केले आहे. या दोन्ही विद्यार्थिनींनी राज्यात टॉपर म्हणून मानाचा किताब पटकावत शिष्यवृत्तीही मिळवली आहे.



**'आयटीओ' परीक्षेत मिळवले यश**

विद्यार्थिनींच्या या यशामागे त्यांचा सातत्यपूर्ण अभ्यास, चिकाटी आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. इंग्रजी विषयातील उत्कृष्ट प्रावीण्यामुळे त्यांनी ही कामगिरी साध्य केली आहे. त्यांच्या या यशामुळे संपूर्ण शाळेचा अभिमान •➤ पान २ वर

## वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेलजवळील कळंबोली जेएनपीटी हायवेवर करंजाडे एक्झिट पॉइंटवर एका मोटारसायकलीस अज्ञात वाहनाची ठोकर बसून झालेल्या अपघातात मोटारसायकलस्वाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. विनय सोनवणे (३०) रा. खारघर हा त्याच्या ताब्यातील होंडा एक्सपल २०० मो.क्र. एमएच-०३-डीआर-७१९० हीने जात असताना पनवेल शहराजवळील कळंबोली जेएनपीटी हायवेवर करंजाडे एक्झिट पॉइंटवर यातील अज्ञात आरोपीताने त्याच्या ताब्यातील वाहन हयगयीने, बेदरकारपणे, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालवून विनय सोनवणे यांच्या दुचाकीला ठोकर दिली.

# प्रतिकूल परिस्थितीत पक्षाला बळ द्या

## डॉ. रागिणी नायक यांचे मार्गदर्शन




। नेरळ । प्रतिनिधी ।

काँग्रेस पक्षाला पुन्हा सक्षम करण्यासाठी नेहरू-गांधी विचारांची गरज असून प्रतिकूल परिस्थितीत सर्व कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन पक्षाला साथ द्यावी, असे आवाहन काँग्रेसच्या राष्ट्रीय प्रवक्त्या डॉ. रागिणी नायक यांनी केले. कर्जत तालुका काँग्रेस कमिटीच्या बैठकीत त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधत मार्गदर्शन केले.

प्रदेश काँग्रेसच्या 'संघटन सृजन अभियान' अंतर्गत नेरळ येथील साने हॉलमध्ये या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रदेश सरचिटणीस प्रदीप राव, मनीष गणगोरे, रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, महिला जिल्हाध्यक्ष ॲड. श्रद्धा ठाकूर, मिलिंद पाडगावकर, विवेक म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच नाना म्हात्रे, माजी उपसभापती अरविंद पाटील, डॉ. सदावर्ते, मंदा सोनटक्के आदी कार्यकर्तेही उपस्थित होते.

डॉ. रागिणी नायक यांनी केंद्र सरकारवर टीका करताना पंतप्रधानांच्या '५६ इंच छाती' या विधानाचा उल्लेख केला. देशाच्या सुरक्षेच्या मुद्द्यांवर प्रश्न उपस्थित करत त्यांनी म्हटले की, ''चीन भारताच्या सीमेत घुसखोरी करत असताना ठोस भूमिका दिसत नाही. इंदिरा गांधी यांनी पाकिस्तानविरुद्ध निर्णायक भूमिका घेत देशाची ताकद दाखवून दिली होती. आज तशी भूमिका अपेक्षित आहे.''

त्या पुढे म्हणाल्या की, काँग्रेसने देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यापासून ते माहिती तंत्रज्ञान, शिक्षण, महिला सक्षमीकरण अशा अनेक क्षेत्रांत मोठे योगदान दिले आहे. आज संघटना पुन्हा उभी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी एकजूट दाखवण्याची गरज आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

प्रदेश सरचिटणीस मनीष गणगोरे यांनी सांगितले की, १९९९ पूर्वी काँग्रेसची ताकद जिल्ह्यात मोठी होती. नंतर झालेल्या राजकीय घडामोडींमुळे पक्ष कमजोर झाला. मात्र 'संघटन सृजन अभियान'मुळे कार्यकर्ते पुन्हा सक्रिय होऊन पक्षाशी जोडले जातील.

तालुका अध्यक्ष संजय गवळी यांनी कर्जत तालुक्याची परिस्थिती मांडताना सांगितले की, हा आदिवासी बहुल तालुका असून येथे उद्योगधंदे कमी आहेत. इतर पक्ष आर्थिकदृष्ट्या सक्षम असले तरी काँग्रेसचे कार्यकर्ते ठामपणे उभे आहेत.

### कार्यकर्ते अजूनही ठाम : महेंद्र घरत

रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी पक्षाच्या स्थितीबाबत स्पष्ट भूमिका मांडत सांगितले की, ''राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाल्यानंतर कर्जत तालुक्यात काँग्रेसची ताकद कमी झाली. अनेक वर्षे सत्तेत असूनही स्थानिक कार्यकर्त्यांना अपेक्षित संधी मिळाली नाही, ही वस्तुस्थिती आहे. मात्र आजही तालुक्यातील कार्यकर्ते पक्षाचा झेंडा टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करत आहेत.''

पान १ वरून

## तटकरे खोलात?

या साखळीमुळे अंधारे यांनी थेट संशय व्यक्त करत, एकाच व्यक्तीमार्फत वेगवेगळ्या राजकीय व्यक्तींमध्ये आर्थिक संबंध जोडले जात आहेत का? असा प्रश्न उपस्थित केला. त्यांनी या संबंधांना 'योगायोग' मानणे कठीण असल्याचेही नमूद केले. अंधारे यांनी पुढे सांगितले की, निलेश चाकणकर आणि आकाश चौधरी यांच्या प्रकल्पाची किंमत सुमारे ४५० ते ५०० कोटी रुपयांच्या घरात असल्याचे समोर येत आहे. इतक्या मोठ्या गुंतवणुकीचा स्रोत काय आहे, हा महत्त्वाचा मुद्दा असून, याची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे.

महिला आयोगाच्या कामकाजावर अप्रत्यक्ष टीका करत, महिलांचे प्रश्न प्रलंबित असताना उद्योग उभारणीला प्राधान्य का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. दरम्यान, या प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेने लक्ष घालावे, सर्व व्यवहारांची तपासणी करावी आणि संबंधित कंपन्यांची आर्थिक कागदपत्रे तपासावीत, अशी ठोस मागणी अंधारे यांनी केली आहे. या गंभीर आरोपांवर संबंधितांकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नसून, राजकीय वर्तुळात मात्र या प्रकरणावर जोरदार चर्चा सुरू झाली आहे. पुढील काही दिवसांत या प्रकरणात आणखी नवे खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## आरोग्यसेवकांना नियुक्तीपत्र

विनय कदम यांना उपकेंद्र वेळास–श्रीवर्धन, प्रशांत दुधमल यांना उपकेंद्र वेळास–श्रीवर्धन, सागर वेहेळे यांना उपकेंद्र चौक–खालापूर, अनंता वायाळ उपकेंद्र निजामपूर–महाड, अजयसिंह सावंत भोसले यांना उपकेंद्र दासगाव–महाड येथे नियुक्त करण्यात आले आहे. साकिब पटेल यांना उपकेंद्र आचळोली–महाड, किरण किर्तने यांना उपकेंद्र मोठे शहापूर–अलिबाग, जगदीश सुलाने यांना उपकेंद्र खारआंबोली–मुरूड, प्रकाश शिंदे यांना उपकेंद्र मांघरुण–महाड, अमोल जाधव यांना उपकेंद्र नेवरुळ–म्हसळा, राजेंद्र जोनवाल यांना उपकेंद्र वेळास–श्रीवर्धन येथे नियुक्त करण्यात आले आहे. या सर्व १३ उमेदवारांना नियुक्ती आदेश पत्र रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या हस्ते सोमवारी देण्यात आले. तसेच सर्व नियुक्त उमेदवारांचे उपाध्यक्ष मधुकर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## रायगडात 'हापूस' संकटात

मोहोर दिसत असला तरी प्रत्यक्षात फळ धारणा अत्यल्प राहिली. सध्या अनेक ठिकाणी केवळ ५ टक्केच आंबा शिल्लक आहे. त्यातच अवकाळीचा फटका बसत आहे.

या फळावर रोगांचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे त्यावर औषध फवारणीवर खर्च वाढला आणि उत्पादन शून्य अशी स्थिती झाली. हवामानातील बदलामुळे तुडतुडे व भुरीसारख्या रोगांचा प्रादुर्भाव वाढला. शेतकऱ्यांनी फवारणीसाठी मोठा खर्च केला. एका फवारणीसाठी तब्बल ४५ हजार रुपये माणगाव तालुक्यातील मोर्बा येथील बागायतदार शेतकरी अबूबकर गंगरेकर यांना आला खर्च आला. त्यांनी आपल्या आंबा फळ पिकावर तीन ते चार वेळा औषध फवारणी केली. तरीही उत्पादनावर काहीच परिणाम झाला नाही. ''फवारणी केली, एवढंच समाधान; पण हातात काहीच आलं नाही,'' अशी शेतकऱ्यांची हतबल प्रतिक्रिया आहे.

रायगड जिल्ह्यात १२ हजार हेक्टर क्षेत्रावर आंबा फळ बागायती क्षेत्र आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे रायगड जिल्ह्यात ९० टक्के आंबा पिकाचे नुकसान झाले आहे. याबाबत जिल्ह्यात विद्यापीठाच्या तज्ज्ञ शास्त्रज्ञांकडून नुकसानीचा सर्वे करण्यात आला. त्याचा अहवाल शासनाकडे पाठविला असून, या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत अद्याप शासन स्तरावरून नुकसान भरपाईचे आदेश आलेले नाहीत. शासनाकडून जे आदेश येतील, त्याप्रमाणे पुढील कारवाई केली जाईल, असे जिल्हा कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी सांगितले.

## वढाव बहिरी देवाची यात्रा

आणि भाविकांचा उत्साह ओसंडून वाहताना दिसतो.

यात्रेतील आणखी एक आकर्षण म्हणजे 'लेपा' फिरवण्याची प्रथा. यामध्ये तरुणांकडून पारंपरिक पद्धतीने अंगावर काटेरी पेरकुट (निवडुंग) मारण्याची प्रथा आजही जपली जाते. श्रद्धेच्या भरात अनेक तरुण स्वतःच्या अंगावर पेरकुट मारताना दिसतात. काही जण या कृतीत इतके तल्लीन होतात की ते रक्तबंबाळ होतानाही मागे हटत नाहीत. तसेच काही भाविक पेरकुटांच्या राशींवर उड्या मारतानाही दिसून येतात. ही प्रथा अनेक वर्षांपासून सुरू असून, भाविक ती अत्यंत श्रद्धेने पाळत आहेत. सायंकाळच्या सत्रात देवकाठ्यांची चढाओढही यात्रेचे आणखी एक आकर्षण ठरते.'या आगळ्यावेगळ्या परंपरा आणि थरारक विधी पाहण्यासाठी रायगड जिल्हा तसेच आसपासच्या भागातून मोठ्या संख्येने भाविक वढाव येथे हजेरी लावतात. श्रद्धा, परंपरा आणि उत्साह यांचा संगम अनुभवण्यासाठी ही यात्रा विशेष ओळख निर्माण करत आहे.

## व्यावसायिकाने जीवन संपविले

कामगाराच्या लक्षात आली. त्यांनी तात्काळ दिनेश यांना अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी नेले. तेथील डॉक्टरांनी तपासून ते अगोदरच मृत झाल्याचे घोषित केले. कर्जबाजारी झाल्याने त्यांनी आत्महत्या केल्याची माहिती त्यांच्या नातेवाईकांनी दिली आहे. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## दहा आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश

असताना बोगस दिव्यांग प्रमाणपत्र मिळवून अधिकारी झालेल्यांवर कारवाईचा सपाटा लावला होता. त्यामध्ये अनेक जिल्ह्यांतील जिल्हा परिषदेतील शेकडो कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई सुरू असतानाच आता त्यांची बदली करण्यात आली आहे.

लोकेश चंद्र – अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि. यांची मुख्यमंत्री यांचे अतिरिक्त मुख्य सचिव, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अश्विनी भिडे – मुख्यमंत्री यांचे अतिरिक्त मुख्य सचिव, यांची बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. विकास चंद्र रस्तोगी– अतिरिक्त मुख्य सचिव (कृषी), कृषी व एडीएफ विभाग, मंत्रालय, मुंबई, यांची अतिरिक्त मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. विनिता वैद्य सिंघल– प्रधान सचिव, आपत्ती व्यवस्थापन, पुनर्वसन व मदत कार्य, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई, यांची प्रधान सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. परिमल सिंह – प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, मुंबई, यांची सचिव (कृषी), कृषी व एडीएफ विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तुकाराम मुंढे– सचिव, दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई, यांची सचिव, आपत्ती व्यवस्थापन, पुनर्वसन व मदत कार्य, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. लहू माळी– व्यवस्थापकीय संचालक, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प लि., मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. माणिक गुरसळ– सचिव, दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. प्रेरणा देशभ्रतार – सह आयुक्त, राज्य कर विभाग, मुंबई, यांची आयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पृथ्वीराज बी.पी.– अतिरिक्त आयुक्त, पुणे महानगरपालिका यांची आयुक्त, वसई–विरार महानगरपालिका, विरार या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

## नवी मुंबईचा ६,७०४ कोटींचा फुगीर अर्थसंकल्प

समितीसमोर सादर केले. त्यानंतर स्थायी समितीने गोपनिय पध्दतीने अर्थसंकल्प तयार करून आज तो महासभेत मांडला. २०२६–२७ या आर्थीक वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये स्थायी समितीचे सभापती अशोक पाटील यांनी वस्तु व सेवा कर अनुदानापासून १ हजार ८९७ कोटी रुपयांचे उत्पन्न अपेक्षित धरले आहे. मालमत्ता कर हा महापालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत आहे. त्यापासून १ हजार २०० कोटी रुपये उभा राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. महापालिकेला सर्वच महसुलातून मिळणारे उत्पन्न ४ हजार ३३७ कोटी रुपये इतके अपेक्षीत धरलेले असताना अर्थसंकल्प मात्र ६ हजार ७०४ कोटी रुपयांचा सादर करण्यात आला आहे. २०२५–२६ या आर्थिक वर्षात पालिकेचे महसुली उत्पन्न हे अडीच हजार कोटींच्या आसपास होते.

## पोलादपुरात अवकाळी

अचानक वादळी पावसाने वातावरणात काहीसा गारवा निर्माण केला. या पावसाचा परिणाम मर्यादित राहिला असून, तालुक्यातील इतर भागात उष्णतेचा तडाखा कायम असल्याचे दिसून आले. दुपारच्या सुमारास तापमान तब्बल ३९ अंश सेल्सियसपर्यंत पोहोचल्याची नोंद करण्यात आली आहे. अवकाळी पावसामुळे काही काळ दिलासा मिळाला असला, तरी वाढत्या तापमानामुळे नागरिकांना उकाड्याचा सामना करावा लागत आहे.

## पीएनपीच्या विद्यार्थिनी राज्यात अव्वल

वाढला असून, शिक्षकवृंद व पालकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. पीएनपी संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका वेल्लईम्मल्ल वेणी, उपमुख्याध्यापिका सदाफ शहाबाजकर यांनी उल्लेखनीय कामगिरीबद्दल दोघींचे अभिनंदन केले. सान्वी पटेल आणि वीरा फार्णे यांच्या यशाबद्दल सर्व स्तरावरून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## मुरुडमध्ये लाचखोर कनिष्ठ अभियंत्याला बेड्या

तीन लाख रुपयांची मागणी केली होती. त्यानंतर तडजोडीअंती २ लाख ५० हजार रुपये देण्याचे ठरले. दरम्यान, संबंधित ठेकेदाराने याबाबत अलिबाग येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीची शहानिशा केल्यानंतर एसीबीने सापळा रचला. मुरुड येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात तक्रारदाराकडून २ लाख ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताना बोऱ्हाडे यांना रंगेहात अटक करण्यात आली. ही कारवाई एसीबी, रायगड पथकाच्या पोलिस उपअधीक्षक सरिता भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. तसेच पोलिस निरीक्षक निशांत धनवडे, नारायण सरोदे, तसेच कर्मचारी विनोद जाधव, अरुण करकरे, महेश पाटील, सुमित पाटील, सचिन आरपाडकर, नवदित नांदगावकर आणि मोनिका मोरे यांनी या कारवाईत सहभाग घेतला. या घटनेमुळे शासकीय कामकाजातील भ्रष्टाचाराचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, पुढील तपास सुरू आहे.

## जवानाचा संशयास्पद मृत्यू

असल्याचे सांगितले जात असले तरी पत्नी रूपज्योती कदम, वडील प्रकाश कदम आणि आई सुनीता कदम यांनी हा घातपात असल्याचा संशय व्यक्त केला आहे. जवानाचा मोबाईल, ओळखपत्र व बॅग बेपत्ता असल्याने तसेच शवविच्छेदन अहवालातील जखमांमुळे संशय अधिक बळावला आहे. दरम्यान, या प्रकरणाची सखोल चौकशी करून न्याय द्यावा, अशी मागणी कुटुंबियांनी केली असून, पुढील तपासाबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

## चौघे जण वर्षभरासाठी तडीपार

बाबू ढेबे (४५), योगेश साहू झोरे (२८), मिलिंद दामू झोरे (२४) आणि बाबाराम कोंडू होगाडे (५७) यांचा समावेश आहे. यापैकी तीन तरुण तर एक वृद्ध व्यक्ती आहे.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील वर्णनाची मौजे चेंढरे, तालुका- अलिबाग जि. रायगड येथील बिनशेती मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. शेखर विष्णू मगर मु.पो. वेश्वी, ता. अलिबाग जि. रायगड यांच्या खुद्द मालकीची मिळकत कायम स्वरुपी आमच्या अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहेत.

**मिळकतीचे वर्णन खालिल प्रमाणे.**

| मौजे | भूमापन क्र.व उपविभाग. | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार रु. |
|---|---|---|---|
| चेंढरे | ८/२/६ | ३.९०.०० | ३९.०० |

या मिळकतीपैकी श्री. शेखर विष्णू मगर यांच्या मालकीहक्कातील व ताबेकब्जा वहिवाटातील क्षेत्र. १.००.०० आर.चौ.मी आकार रु.पै. १०.०० या बिनशेती मिळकती बाबत.

सदरची मिळकत विद्यमान मालकांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, इजमेंट, बोजा, साठेकरार, ताबा कब्जा, लीएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबध असल्यास त्यानी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापांसून ७ (सात) दिवसांच्या आत खाली दिलेल्या आमच्या पत्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरुपात समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

अलिबाग — सही/-
तारीख - ३१/०३/२०२६
**ॲड. मनोज परशूराम ओव्हाळ**
रजिस्टर ऑफिस समोर अलिबाग गाळा नं.६
ता. अलिबाग जि. रायगड मो. ९८८१२७७४४९

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या बागायती मिळकतीमधील विद्यमान मालक रविंद्र मधुकर घरत, शैलेश मधुकर घरत व सुभाष मधुकर घरत यांचे नावे सातबारा अभिलेखामध्ये दर्शविण्यात आलेले क्षेत्रामधील ०-०८-०० हे. आर. क्षेत्र खरेदी घेणेचा व्यवहार निश्चित केला आहे. सदर मिळकतीमधील हक्क हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा सदर विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे थेरोंडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|
| २४/१ | ०-७०-८० | ३९-१९ |

पैकी रविंद्र मधुकर घरत, शैलेश मधुकर घरत व सुभाष मधुकर घरत यांचे नावे सातबारा अभिलेखात नोंदविण्यात आलेले क्षेत्र ०-४०-१३ हे.आर., पो.ख. ०-०२-५० हे. आर., आकार रू. २३-०३ पै. पैकी ०-०८-०० हे. आर. बागायती क्षेत्र

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून मिळकतीचे खरेदीखत पूर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- ०१/०४/२०२६
**ॲड. निलेश अशोक म्हात्रे**
'गुरूकृपा' 'अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे पोटल, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक १) अशीत रमेश झवेरी २) सुहास काशिराम बांदेकर यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ५७ | ३ | ०-२८-९० | ०=१६ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक ३१/०३/२०२६
**ॲड. महेश मोतीराम घारे**
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४
९२७१८६९२०२

## निवडक

### सहा वर्षांच्या अझलानने पूर्ण केले रोजे



**सोगाव :** पवित्र रमजान महिन्यात रोजा (उपवास) पाळणे हे मोठ्यांसाठीही आव्हानात्मक मानले जाते. मात्र, मुरूड तालुक्यातील मांडला येथील अवघ्या ६ वर्षांच्या अझलान वसीम दाखवे या चिमुकल्याने यंदा संपूर्ण ३० दिवसांचे रोजे पूर्ण करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

इतक्या लहान वयात घेतलेला हा संकल्प अझलानच्या दृढ श्रद्धा, जिद्द आणि आत्मविश्वासाचे उत्तम उदाहरण ठरत आहे. पहाटे सहरीपासून ते सूर्यास्तापर्यंत उपवास पाळत त्याने अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने सर्व रोजे पूर्ण केले. या काळात त्याने कोणतीही तक्रार न करता उपवासाचे नियम पाळले, ही बाब विशेष उल्लेखनीय ठरत आहे. अझलानच्या या यशामागे त्याच्या कुटुंबियांचा मोठा पाठिंबा आहे. पालकांनी त्याला योग्य मार्गदर्शन करत उत्साह वाढवला, त्यामुळेच तो संपूर्ण महिनाभर रोजे पाळण्यात यशस्वी ठरला. रमजान हा संयम, त्याग आणि ईश्वरभक्तीचा संदेश देणारा पवित्र महिना मानला जातो. अशा महिन्यात एवढ्या लहान मुलाने घेतलेला हा प्रेरणादायी निर्णय समाजातील इतर मुलांसाठीही आदर्श ठरत आहे. अझलानच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे मांडला येथील मोहल्ल्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून स्थानिक नागरिकांकडून त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. लहान वयातच दाखवलेली ही चिकाटी आणि धार्मिक निष्ठा सर्वांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

### घरगुती सिलिंडरचा साठा जप्त

**मुंबई :** शिधावाटप विभागाने गॅसचा काळाबाजार रोखण्यासाठी कठोर पावले उचलली आहेत. याच पार्श्वभूमीवर सांताक्रूझ (पूर्व) येथील उपनिबंधक शिधावाटप (ड परिमंडळ) कार्यालयाच्या पथकाने जोगेश्वरी पूर्व परिसरात घरगुती गॅस सिलिंडरचा साठा जप्त करण्यात आला आहे. लजीज शिक कबाब हॉटेलमध्ये घरगुती वापराचे गॅस सिलिंडर साठवून त्याचा व्यावसायिक वापर केला जात असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ अंतर्गत कायदेशीर कारवाई करून शिधावाटप अधिकारी हरीश पटेल यांनी अंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद केला. या प्रकरणात वाहिद अमीन अत्तार याला अटक करण्यात आली आहे. सहाय्यक नियंत्रक अश्विन रोहिणीकर यांच्या नियंत्रणाखाली तसेच उपनियंत्रक भास्कर तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली आहे.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागि- नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमच्या अशिल सौ. अंजनी अरविंद मांडके, रा. कार्डिनल बिल्डींग. प्लॉट नं. ४०४, हिरानंदानी इस्टेट जी.बी. रोड पातलीपाडा ठाणे ४००६०७ यांनी दिलेल्या माहितीवरून व त्यांचे सांगण्यावरून खालील नमुद मिळकतीबाबत जाहीर नोटीस देण्यात येते ती खालीलप्रमाणे.

सदर मिळकत श्री. चंद्रकांत चिंतामण पाठारे यांच्या खुद्द मालकीची व प्रत्यक्ष ताबे, कब्जा, वहिवाटीत असलेली मिळकत त्यांच्याकडून कायम विकत घेण्याबाबत आमचे अशिलांनी व्यवहार करणेचे ठरविलेले आहे व त्याबाबत सदर मिळकत खरेदी करण्यास जमिन मालकांचे हक्क अबाधित असल्याबाबत आमचे अशिलांना त्यांनी माहीती दिलेली आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | भुधारण पद्धती | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|---|
| आक्षी ता.अलिबाग, जि. रायगड | ७७/१ | वर्ग १ | एकुण २२-८०-०० | २८८.०० |

वर वर्णन केलेली संपुर्ण मिळकत व त्या मिळकतीतील आक्षी ग्रामपंचायत घर क्र.७८८ ही या जाहिर नोटीशीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतींचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, पतसंस्थांचे/बॅकांचे कर्जाचा बोजा, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतींच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १० दिवसांचे मुदतीत खालिल सही करणार यांचेकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून त्याबाबतचा खरेदी व्यवहार आमचे अशिल सदर मिळकतीचे विद्यमान मालकांशी पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग — सही/-
दिनांक : ३०/०३/२०२६
**ॲड. संतोष अ. राऊत**
पत्ता: मु.पो.आक्षी, साई मंदीराजवळ,
ता. अलिबाग, जि. रायगड,
फोन नं. ९२०९७२२५६६

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल इसरार सरदारमिया पटेल यानी मौजे आनंदवाडी (नेरळ), ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकतीचे मालक यांचे नावे असलेले खालील प्रमाणे विकत घेण्याचे ठरवीले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन : मौजे आनंदवाडी(नेरळ), ता. कर्जत, जि. रायगड**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| श्री.हरिश्चंद्र गजानन होले व वगैरे ९ | ५३ | २ | ०-५०-०० यापैकी ०-१६-०० | १-८४ |

वरील मिळकती ह्या आमचे अशिलांस विकत देणेचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसीद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.
कळावे.

दि. १/०४/२०२६
ॲड. निलेश रखमाजी पादीर
मोबा.नं.९७६७६३७१००/ ९२७२५६२१५८.
ॲड. हरिचंद्र अंनता हिंदोळा
मोबा नं. ७७७६८१८९४७/९८३४४८२१०८

**ॲड. दिपक रखमाजी पादीर**
मु. पो. नेरळ (मोहाचीवाडी),
ता. कर्जत, जि. रायगड
मो.९८५०७६७५६८

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे


१ एप्रिल
१) श्री. भाईलाल मनजी पटेल
श्रीबाग, अलिबाग
३१-३-१९५९

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**



डॉ अदिती संजीव शेटकर वाढदिवस अलिबाग

गजानन शांताराम तांडेल, स्मरणार्थ अलिबाग

अविनाश विघ्नेश्वर मुकादम, अलिबाग



श्री. बी के पाटील, वाढदिवस अलिबाग

### बाहे येथे हनुमान जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन

**खांब :** रोहा तालुक्यातील कृषीनिष्ठ बाहे गावामध्ये सालाबादप्रमाणे याही वर्षी दि.१ आणि २ एप्रिल रोजी हनुमान जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त दि.१ एप्रिल रोजी सायं.५ वाजता हरिपाठ, सायं. ७ ते ९ डॉ. हरिदास महाराज पालवे शास्त्री आळंदी यांची हरिकिर्तनरूपी सेवा तद्नंतर महाप्रसाद व रात्रौ.११ वाजता भव्य काठी मिरवणूक सोहळा तर दि.२ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता श्री हनुमान जन्म सोहळा व अभिषेक, सकाळी १० वा. महापूजा, दुपारी पालखी सोहळा व रात्री ९ वाजता महाप्रसाद आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम साजरे करण्यात येणार आहेत. या संपूर्ण सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी ग्रामस्थ व महिला मंडळ बाहे तसेच तरूण मंडळ बाहे सहकार्य करीत आहेत.

### जाहीर सूचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली जमीन मिळकत विद्यमान मालक यांचे मालकी ताबे कब्जातील असल्याची ग्वाही विद्यमान मालकाने दिल्यावरून त्यांचे कडून आमचे खरेदीदाराने खालील वर्णनाची जमीन मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे. आणि तश्या आशयाची बोलणी त्यांचा व आमच्या खरेदीदाराच्या दरम्यान झाली आहे. सदरची खाली वर्णन केलेली मिळकत ही निर्वेध व बोजविरहित असल्याचा भरवसा आमचा अशिलांना विद्यमान मालक सत **निशिकांत लक्ष्मण गुळेकर व इतर** यांनी दिला आहे. सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणतीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी खालील पत्यावर त्यांची हरकत लेखी नोंदवावी. मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे –

| गाव | गट न | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| फुफादेवी पाडा तालुका:- अलिबाग | १२/१०/ब | क्षेत्र १.७०.०० हेक्टर आर<br>+पोट खराबा ०.२२.०० हेक्टर आर<br>एकूण १.९२.०० हेक्टर आर | २.२५ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचीही वहिवाट दान, गहाण, बक्षीस, लिस, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदि कोणत्याही प्रकारे कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी त्याची हरकत योग्य त्या कागदोपत्री, पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खालील पत्यावर सही करणार यांच्याकडे कळवावे, तशी कोणाचीही हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध व बिनजोखीम आहे, असे समजून आमचे खरेदीदार सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व मागावून आलेली कोणतीही हरकत आमचे खरेदीदारावर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेनी नोंद घ्यावी.

दिनांक - ०१/०४/२०२६ — (खरेदीदाराचे वकील)
सही /–
डॉ. ॲड. निहा ए. राऊत
लब्बैक, इस्राईल अली, अलिबाग,
जिल्हारू– रायगड– ४०२२०१
संपर्क :– ८३७८९६४३३३

# निवडक

## प्रज्ञाशोध परीक्षेत व्योम भगत प्रथम

**अलिबाग** : महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षेत अलिबाग-वेश्वी येथील पीएनपी होली चाईल्ड सी.बी.एस.ई. स्कूलमधील विद्यार्थी व्योम भगत याने उल्लेखनीय यश संपादन करत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच, रायगड जिल्ह्यात तृतीय आणि राज्य पातळीवर २० वा



क्रमांक मिळवून त्याने यशाची नवी उंची गाठली आहे. व्योमने आपल्या परिश्रम, चिकाटी आणि नियोजनबद्ध अभ्यासाच्या जोरावर हे यश मिळवले आहे. या परीक्षेत व्योम भगतने एकूण २६८ गुण मिळवून उत्कृष्ट कामगिरी केली आहे. भाषा, गणित, मराठी, इंग्रजी तसेच बुद्धिमत्ता या सर्व विषयांमध्ये त्याने उत्तम गुण मिळवले आहेत. या यशाबद्दल त्याला रोख रक्कम पारितोषिक, चषक आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. त्याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, शाळेच्या मुख्याध्यापिका वेल्लईम्मल्ल वेणी, उपमुख्याध्यापिका सदाफ शहाबाजकर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आदींकडून अभिनंदन करण्यात आले. व्योम भगत याच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.



## माथेरानमध्ये गॅस पुरवठा पूर्ववत

**माथेरान** : युद्धसदृश परिस्थितीमुळे देशभरात गॅस व इंधन टंचाईची झळ बसत असताना माथेरानमध्ये गेल्या १५ ते २० दिवसांपासून व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा पूर्णपणे ठप्प झाला होता. त्यामुळे हॉटेल, रेस्टॉरंट, तसेच स्टॉलधारक व्यावसायिकांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर माथेरानचे नगरसेवक तथा विरोधीपक्ष गटनेते सिताराम कुंभार, नगरसेवक सचिन दाभेकर, किरण पेमारे, नगरसेविका अनिता रांजाणे व अनुसया ढेबे यांनी तहसील प्रशासनाकडे पत्र देऊन गॅस पुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली होती. तहसील अधीक्षक सुरेंद्र सिंग ठाकूर यांनी या मागणीची तातडीने दखल घेत परिस्थितीचा आढावा घेतला व आवश्यक आदेश दिले. त्यानुसार माथेरानमध्ये व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा पुन्हा सुरू करण्यात आला असून टप्प्याटप्प्याने सर्व व्यावसायिकांना गॅस उपलब्ध करून दिला जाणार आहे.

## अलका खारपाटील यांचे निधन

**चिरनेर** : उरण तालुक्यातील चिरनेर येथील अलका काळूशेठ खारपाटील (८६) यांचे मंगळवारी (दि.३१) निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर चिरनेर येथील मुक्तिधाम स्मशानभूमीत विविध



क्षेत्रातील मान्यवरांच्या, नातेवाईकांच्या व ग्रामस्थांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन पुत्र, सात कन्या, सुना, नात सुना, जावई, नातवंडे, पंतवंडे असा मोठा आप्त परिवार आहे. शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते स्वर्गीय काळूशेठ धाकू खारपाटील यांच्या त्या सहचारिणी होत्या. तर, महाराष्ट्र शासनाचे शेतीनिष्ठ पुरस्कार प्राप्त शेतकरी तथा कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील, तसेच शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते प्रशांत खारपाटील यांच्या त्या मातोश्री होतं. अलका खारपाटील यांनीही शेतकरी कामगार पक्षाचा लाल बावटा जनसामान्यांमध्ये रुजविण्यासाठी महत्वाची भूमिका बजावली होती.



● (छायाचित्रः संजय गायकवाड)

## कर्जतमधील ठेकेदारांचे ठिय्या आंदोलन

**कर्जत** : कर्जत तालुक्यातील ठेकेदारांचे विविध शीर्षका अंतर्गत २०४ कोटी रुपयांची बिले मागील तीन वर्षांपासुन प्रलंबित आहेत. त्यामुळे ठेकेदारांची आर्थिक स्तिथी खालवली आहे. कामासाठी घेतलेल्या कर्जावर बँकेचे वाढणारे व्याज आणि उधारी मिळावी, यासाठी सप्लायर्सनी लावलेला तगादा यामुळे ठेकेदार घायकुतीला आले आहेत. दर वर्षी मार्च अखेर रखडलेली बिले मिळतातच. त्यासाठी अधिकारी वर्गाने शासनाकडे पाठपुरावा करून भरीव निधी आणावा, या करिता कर्जत तालुका ठेकेदार संघटनेचे अध्यक्ष राहुल डाळिंबकर यांनी मागील आठवड्यात आमरण उपोषणाचे हत्यार उपसले होत. उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी कार्यकारी अभियंता संदीप चव्हाण यांनी, दोन दिवसांत भरीव निधी आणेन असे आश्वासन देऊन उपोषण सोडण्यास भाग पाडले होते. परंतु, या वर्षी कुठल्याही शीर्षकाला एक रुपयाचा सुद्धा निधी प्राप्त होणार नाही याची खात्री पाटल्याने संघटनेचे अध्यक्ष राहुल डाळिंबकर यांच्यासह सर्व ठेकेदारांनी चव्हाण यांच्या कार्यालयात बसून ठिय्या आंदोलन केले.

## रेवदंडा स्थानक अपघातांना निमंत्रण

**रेवदंडा :** एसटी बसस्थानक आवारात पडलेले मोठे खड्डे व बेशिस्तपणे केलेल्या वाहन पार्किंगमुळे या ठिकाणी मोठा अपघात होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. रेवदंडा एसटी बसस्थानक अलिबाग, मुरूड व रोहा तालुक्याला मध्यवर्ती ठिकाण आहे. त्यामुळे नित्याने या तिन्ही तालुक्यात येथून एसटी बसेस ये-जा करत असतात. तसेच, मुरूड आगारातून मुंबई, पुणे, ठाणे, शिर्डीसह दुरवर जात असलेल्या एस.टी. बसेसना या ठिकाणी थांबा आहे. त्यामुळे या स्थानकात प्रवासीवर्ग व स्थानिकांची नेहमीच वर्दळ असते. परंतु, याच रेवदंडा स्थानकात पावसाळ्यात मोठंमोठे खड्डे निर्माण झाले होते. त्यात पाणी साचून तळी निर्माण झाली होती. सध्या उन्हाळ्याचे दिवस असून हे खड्डे पुर्णपणे कोरडे पडले असून धूपेने ते खड्डे आणखी वाढत आहेत. त्यामुळे बसेमधील प्रवाशांना धक्का बसतो, तसेच खड्डे चुकविताना वाहन चालकांची सुद्धा भंबेरी उडते. त्यामुळे अपघात होण्याची निश्चित शक्यता संभवते. एसटी प्रशासन बस स्थानकातील दुरवस्थेकडे दुर्लक्ष करत असल्याने प्रवासीवर्ग व स्थानिक ग्रामस्थांमधून संप्तत प्रतिक्रिया व्यक्त करत आहेत.

# उरणमध्ये कर वसुलीत अडचण

## मुलभूत सेवा पुरविण्यात अडथळा

## उत्पन्नापेक्षा खर्चच जास्त

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उरण नगरपरिषदेची स्थापना ब्रिटिश काळात म्हणजेच १८६७ साली झाली. जकात हे या नगरपरिषदेच्या १५९ वर्षांच्या कारकिर्दीतील एकमेव उत्पन्नाचे साधन होते. परंतु, हा जकात सरकारने १९९९ सालापासून बंद केला आहे. त्यामुळे नगर परिषदेकडे मालमत्ता, पाणीपट्टी, मल निस्सारण, शिक्षण, उपकर, आणि सामान्य कर हेच आर्थिक उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत राहिले आहेत. त्यामुळे या करातूनच नगरपरिषदेला प्रशासकीय सेवेसह मूलभूत व पायाभूत सेवा पुरवाव्या लागतात. परंतु, हे कर पूर्णतः वसुली होत नसल्याने उरण नगरपरिषदेला विविध सेवा पुरविताना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागत आहे.

उरण नगरपरिषदेच्या उत्पन्नाचे एकमेव साधन असलेला जकात शासनाने बंद केला. त्यामुळे नगरपरिषदेला मालमत्ता, पाणीपट्टी, मल निस्सारण, शिक्षण, उपकर, आणि सामान्य कर यावर अवलंबून राहावे लागते. त्यातुनच नगरपरिषद सेवा, रस्ते, पथदिवे, कचरा व्यवस्थापन आणि पाणीपुरवठा यासारख्या मूलभूत सुविधा पुरविते. परंतु, हे कर पूर्णतः वसुली होत नसल्याने मूलभूत व पायाभूत सुविधा पुरविण्यात नगरपरिषदेला अडचणी येत आहेत. अवघ्या साडेतीन चौरस किलोमीटर क्षेत्रावर वसलेल्या उरण नगरपरिषदेकडे विविध कराव्यतीरिक्त आर्थिक उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. या करांचीही वसुली वेळेवर होत नसल्याने 'क' वर्गातील उरण नगरपरिषदेला सातत्याने शासनाकडून मिळणाऱ्या निधीची वाट पहावी लागते. मात्र, हा निधीही वेळेवर उपलब्ध होत नसल्याने, शहरातील पायाभूत सुविधांवर परिणाम होतो.

उरण नगरपरिषदेला मालमत्ता करातून ४ कोटी १८ लाख, पाणीपुरवठ्यातून २ कोटी ६० लाख आणि मल निस्सारण, शिक्षण, उपकर असे एकत्रित सुमारे साडेसात कोटी उत्पन्न मिळते. उरण नगरपरिषदेला मिळणाऱ्या विविध करातूनच शहराच्या विकासाचा गाडा हाकावा लागतो. मात्र, प्रशासकीय खर्च आणि विकास कामांसाठी करातून मिळणारे उत्पन्न अत्यल्प आहे. याशिवाय कराची रक्कम ही पूर्णपणे वसूल होत नाही. जो कर मिळतो त्यातील ९० टक्के रक्कम ही खर्ची पडते. त्यामुळे शहराच्या विविध विकास कामांवर परिणाम होत असल्याचे उरण नगरपरिषदेतील शहर रचनाकार निखिल ढोरे यांनी सांगितले.



### उत्पन्नातून ९० टक्के रक्कम खर्ची

नगरपरिषदेची दरवर्षी मालमत्ता कराची वसुली ४.१८ कोटी पैकी २.७५ कोटी म्हणजेच ७५ टक्क्यापर्यंत होते. पाणीपट्टी वसुली १ कोटी ६० लाखांपैकी ४५ ते ५० टक्केच होते. मात्र, पाणी बिलापोटी एमआयडीसीला दरमहा १२ लाख तर वीज बिल १२ लाख आणि इतर विविध खर्चापोटी असे एकूण ४५ ते ५० लाख रुपये खर्च येतो. त्यामुळे मिळणाऱ्या आर्थिक उत्पन्नातून ९० टक्के रक्कम खर्ची पडते.

> **उरण नगरपरिषद कर वसुलीसाठी अभय योजना, वृत्तपत्रात जाहिराती व जनजागृती द्वारे अनेक उपक्रम राबविते. पुनर्विकासाठी निष्कासित केलेल्या इमारतींमुळे मालमत्ता कराची वसुली करता येत नाही. अनेक नळ जोडणीही बंद आहेत. त्यामुळे कर वसुली कमी होते. काम गारांच्या वेतन, पेन्शन, शासकीय इतर खर्च भागवण्यासाठी नेहमीच सरकारकडून मिळणाऱ्या विविध अनुदानाची प्रतीक्षा करावी लागते.**
> **- राजेंद्र घाडगे, ओएस, उरण नगरपरिषद**

# श्रीवर्धन समुद्रकिनारा झाला मोकळा



- **वनविभाग, नगरपरिषदेची संयुक्त मोहीम**
- **अतिक्रमण हटवल्याने पर्यटनाला नवी दिशा**

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

अतिक्रमणाच्या समस्येने त्रस्त असलेल्या श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर अखेर मोठी कारवाई करण्यात आली आहे. वाढत्या टपऱ्या, हातगाड्या आणि अनधिकृत व्यवसायांमुळे किनाऱ्याचे सौंदर्य झाकोळले गेले होते. मात्र, वनविभाग आणि नगरपरिषदेच्या संयुक्त कारवाईमुळे हा किनारा पुन्हा एकदा मोकळा झाला आहे.

गेल्या काही महिन्यांपासून स्थानिक नागरिक, पर्यटक आणि 'कृषीवल'च्या माध्यमातून येथील अतिक्रमणाविरोधात सातत्याने आवाज उठवला जात होता. या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत या विषयावर सखोल चर्चा झाली. स्थानिकांना प्राधान्य देत टपरीधारकांना शिस्त लावण्याचा ठराव मंजूर करण्यात आला आणि त्यानुसार कारवाईचे नियोजन करण्यात आले. वनविभागाने संबंधित टपरीधारकांना नोटिसा बजावून अनधिकृत टपऱ्या हटवण्याचे स्पष्ट आदेश दिले. प्रशासनाच्या कडक भूमिकेमुळे अनेक टपरीधारकांनी कारवाई होण्याआधीच स्वतःहून आपल्या टपऱ्या व हातगाड्या हटवल्या. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण दूर झाले आणि किनाऱ्याने 'मोकळा श्वास' घेतला. या कारवाईमुळे समुद्रकिनाऱ्यावर मोकळी जागा उपलब्ध झाल्याने पर्यटकांसाठी अनेक सुविधा सहज उपलब्ध झाल्या आहेत. फेरफटका मारण्यासाठी प्रशस्त जागा, वाहन पार्किंगची सुधारलेली व्यवस्था व स्वच्छ आणि सुरक्षित वातावरण यामुळे पर्यटकांचा अनुभव अधिक सुखद होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे स्थानिकांचे हॉटेल्स, लॉज आणि भोजनालयांच्या अर्थव्यवस्थेला याचा फायदा होत आहे. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाच्या या कारवाईचे स्वागत केले असले तरी ही मोहीम कायमस्वरूपी असावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली आहे. पुन्हा अतिक्रमण होऊ नये यासाठी नियमित तपासणी, कठोर कायदेशीर कारवाई आणि स्पष्ट नियमावली आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.



**महावीर जयंतीनिमित्त अलिबागमधील जैन समाजाच्यावतीने मंगळवारी (दि.३१) भगवान महावीरांची मिरवणूक काढण्यात आली होती. त्यामध्ये पुरुषांबरोबर महिला देखील मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.** (छायाचित्र : समीर मालोदे)

## वनविभागाच्या भूमिकेवर संशय

**श्रीवर्धन** : तालुक्यातील जावेळेसह पंचक्रोशीतील गावांमध्ये बिबट्याच्या हालचाली वारंवार दिसत आहेत. काही दिवसांपूवी सलग दोन दिवस जोवळे व वडशेत वावे या ठिकाणी बिबट्याने येथील वासरांवर हल्ला चढवला होता. दरम्यान, तीन मानवी बळी गेल्यानंतरच कारवाई करू, असे वनविभागाकडून सांगितले जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे वनविभागाच्या संशयास्पद भूमिकेबाबत श्रीवर्धनच्या ग्रामस्थांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

## विज प्रकल्पाविरोधात शेतकरी एकवटले

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील ढाक, पोटल, पाली या भागात टोरंट कंपनी आपला वीज प्रकल्प उभारत आहे. या प्रकल्पाला स्थानिक पातळीवर शेतकऱ्यांकडून विरोध होत आहे. पर्यावरण सुनावणीमध्ये देखील तीव्र विरोध निदर्शने करून देखील शेतकऱ्यांच्या विरोधकांकडे दुर्लक्ष करीत झाडे कापण्याची कामे सुरु करण्यात आली आहेत. दरम्यान, या भागातील शेतकऱ्यांनी पाली गावात बैठक घेऊन धरणाला विरोध करण्यासाठी कर्जत तहसील कार्यालयावर मूक मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला. टोरंट वीज प्रकल्पामुळे धरण परिसरात तब्बल २५ हजार झाडे तोडली जात आहेत. याबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी गौरकामत येथे घेण्यात आली. त्यावेळी सर्व शेतकऱ्यांनी विरोध केला. यावेळी टोरंट कंपनीला हा प्रकल्प उभारण्यास केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाची परवानगी असल्याचा दाखला दिला. त्यामुळे या भागातील शेतकरी आक्रमक झाला असून आरपारची लढाई पुकारली आहे.

## ग्रामस्थांची पाण्यासाठी धाव



**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

कोर्लई गावाला फणसाड धरणातून पाणी पुरवठा होतो. या धरणातून जलजीवन योजनेअंतर्गत पाणी पुरवठा सुरळीत सुरू होता; परंतु, सध्या कोर्लई येथील मुख्यः रस्तावर रेवस-रेड्डी अंतर्गत रस्त्याचे नुतनीकरण, क्रॉकिटीकरण व रूंदीकरणाचे काम सुरू आहे. त्यासाठी खोदाईची कामे करण्यात आली आहेत. त्यामध्ये ठेकेदारांच्या निष्काळजीपणाने ठिकठिकाणी जलजीवन पाणी पुरवठा पाईप लाईन फुटली आहे. या फुटलेल्या पाईप लाईनची तात्पुरती दुरूस्ती केली जाते. तरी देखील या पाईपलाईनमधून पाणी झिरपत राहते. परिणाम कोर्लई गावापर्यंत पाण्याचा पुरवठा अत्यंत कमी दाबाने होतो. परिणामी कोर्लईकरांना पुरेसे पाणी मिळत नाही. त्यामुळे एकप्रकारे कृत्रीम पाणी टंचाई कोर्लई गावात निर्माण झाली आहे.

काही दिवसांपुर्वी कोर्लई ग्रामस्थांनी या भीषण पाणी टंचाईबाबत सरपंच राजश्री मिसाळ यांच्याशी चर्चा केली होती. परंतु, अद्यापी दोन महिने पुर्ण झाले तरीही पाण्याची टंचाई दुर झाली नसल्याने कोर्लई ग्रामस्थांचे बेहाल झाले आहे. त्यामुळे कोर्लई ग्रामस्थांनी ग्राम पंचायत कार्यालयाकडे धाव घेतली. यावेळी कोर्लई सरपंच उपस्थित नसल्याने ग्रामपंचायत अधिकारी आशा बिरवाडकर-काजारे यांच्याशी ग्रामस्थ व महिलांनी संवाद साधला; परंतु, सरपंच या विषयी बोलतील, असा पवित्रा ग्रामपंचायत अधिकारी यांनी घेतला. त्यामुळे ग्रामस्थांनी अधिक आक्रोश व्यक्त केला.

## कच्छीभवन येथे महारक्तदान शिबीर संपन्न

### १६१ रक्तदात्यांनी केले रक्तदान

**| रायगड | प्रतिनिधी |**

भगवान महावीर जयंतीनिमित्त कच्छीभवन ट्रस्ट अलिबाग आणि लायन्स क्लब अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने कच्छ युवक संघ, ऐकरवाला रक्तदान अभियानाचे आयोजन मंगळवारी (दि.३१) अलिबागेतील कच्छी जैन भवन येथे आयोजित करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात १६१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.





या महारक्तदान शिबिरामध्ये अलिबागच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक, उपनगराध्यक्षा ॲड.मानसी म्हात्रे, नगरसेवक अनिल चोप्रा, अलिबागचे निरीक्षक किशोर साळे, लायन्स क्लब अलिबागचे अध्यक्ष प्रदीप नाईक, गिरिश म्हात्रे, महेश कवळे, रणजित जैन, संतोष पाटील, दिपक पाटील, विकास घरत, नयन कावळे, महेंद्र पाटील, डॉ. राजाराम हुलवान, कच्छी भवन ट्रस्टचे धिरेंद्र काराणे, केतन शहा, धर्मेश देढिया, अमित शहानंद, भावेश पटेल, जतीन काराणे, पारस मोता, सुनील तांबडकर, साई मोटर ट्रेनिंग स्कूलचे मेहूल पाटील, जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे समाजसेवा अधीक्षक संग्राम माकर, वैद्यकीय समन्वयक चिन्मय तळेकर, सदस्य विठ्ठल शिंदे, डॉ. दीपक गोसावी व हेमकांत सोनार आदी उपस्थित होते. तसेच, या रक्तदान शिबिरामध्ये प्रशांत नाईक मित्रमंडळ, लायन्स क्लब अलिबाग डायमंड, अलिबाग रेवस मिनिडोर संघटना, अलिबाग ऑटो रिक्षा संघटना, आगरी समाज संस्था अलिबाग, उज्वल भविष्य सामाजिक संस्था, माणुसकी प्रतिष्ठान आणि मुंबई कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अलिबाग या संस्थांनी देखील सहभाग नोंदविला होता.

**बाजारपेठ १०० वर्षांपासून प्रसिद्ध** | **गत वर्षापेक्षा यंदाच्या दरात दीडपट वाढ**

# कर्जतची मिरची झाली दुप्पट तिखट

**| कर्जत | संजय गायकवाड |**

मसाल्याच्या पदार्थांसाठी कर्जतची बाजारपेट प्रसिद्ध आहे. त्यात येथील लाल मिरचीला महिलांची अधिक पसंती असते. त्यामुळे गेल्या १०० वर्षांपासून कर्जत येथील बाजारपेठ मिरचीसाठी प्रसिद्ध आहे. रायगडच नव्हे तर ठाणे, पुणे, मुंबईहून सुद्धा या बाजारात वर्षानुवर्षे ग्राहक येतात आणि आपल्या आवडीची मिरची आणि मसाले खरेदी करतात. परंतु, गत वर्षापेक्षा यंदाचे दर दीडपट वाढल्याने मिरची दुप्पट तिखट झाल्याचे ग्राहकांमधून बोलले जात आहे.



हल्ली बाजारात तयार मसाले मिळत असले तरी मिरची खरेदी करून त्यात मसाल्याचे पदार्थ टाकून तिखट मसाला बनविण्याची परंपरा कायम आहे. आपण स्वतः तयार केलेला मसाले जास्त दिवस टिकतात, अशी अनेकांची समज आहे. त्यामुळे ग्राहक खासकरून महिला वर्ग कर्जतच्या बाजारपेठेत येऊन मोठ्या प्रमाणात मिरची व मसाल्यांचे पदार्थ खरेदी करून वर्षभरासाठी मसाला तयार करून ठेवतात. कर्जतमधील हा बाजार केवळ चार ते पाच महिने भरतो. आणि या कालावधीत सुमारे दोन-अडीच कोटी रुपयांची उलाढाल होत असते. सध्या ग्रामीण भागात लग्न सोहळ्यांची देखील मोठ्या प्रमाणात लगबग सुरू आहे. त्यासाठी देखील साधारण वीस ते पंचवीस किलो मसाला करण्यासाठी मोठ्या प्रमाणात खरेदी केली जात आहे.

थंडी कमी झाली की मिरची विकत घेण्यासाठी अगदी पेण, अलिबाग, पनवेल, बदलापूर, कल्याण, डोंबिवली, मुरबाड, शहापूर, लोणावळा, पुणे व मुंबईतूनही ग्राहक येत असल्याचे येथील व्यापाऱ्यांडून सांगण्यात आले.

### वधारलेले दर

| मिरची (प्रति किलो) | २०२५ | २०२६ |
|---|---|---|
| गिंटूर | २३० ते २६० रु. | २६० रु. |
| लवंगी | १६० ते १८० रु. | २६०रु. |
| बेडगी | २५० ते २६० रु. | ५०० ते ६५० रु. |
| काश्मिरी | ३०० ते ४५० रु. | ६५० ते ७५० रु. |
| संकेश्वरी | २०० ते २८० रु. | ३६० ते ५६०रु. |
| पट्टी | २३० ते ३२० रु. | ४०० ते ४५० रु. |

> **साधारण ६० वर्षे कर्जत शहरात मिरची विकत असून जनतेचा विश्वास आम्ही मिळविला आहे. आमच्या नंतर पुढील पिढी या व्यवसाय करीलच याची खात्री नाही. तरी देखील माझी दोन्ही मुले आणि सूना मदतीला असतात. त्यामुळे वर्षाकाठी ८०० पोती मिरची विकण्यास मदत होते. एवढी वर्षे खात्रीने आणि सचोटीने व्यवसाय करीत आहे. मी आता ८२ वर्षाचा असूनही दररोज किमान १५ तास मिरचीच्या समोर असून देखील मला त्याचा त्रास जाणवत नाही.**
> **-जयंतीलाल परमार, मिरची व्यापारी**

# पाच वर्षांचा उशीर

देशभरातील जनगणनेला बुधवारपासून सुरुवात होत आहे. जनगणना दर दहा वर्षांनी होते. पूर्वीची गणना १९९१, २००१,२०११ अशी झाली होती. त्यानुसार २०२१मध्ये ती व्हायला हवी होती. पण तेव्हा देशात कोविड असल्याचे कारण सांगून नरेंद्र मोदी सरकारने ही गणना टाळली. वास्तविक त्याच काळात बिहार, बंगाल व इतर काही राज्यांच्या निवडणुका झाल्या. त्यासाठी मोदींच्या लाखोंच्या प्रचारसभा झाल्या. रोडशोदेखील झाले. पण जनगणना करण्याने मात्र कोविड फैलावेल अशी भीती दाखवण्यात आली. हा खास मोदी सरकारचा हम करेसो कायदा होता. समजा कोविडमुळे ती टळली हे खरे मानले तरी २०२२ किंवा २३ मध्ये घेता येणे शक्य होते. पण मुळात ती घेण्याची सरकारची इच्छा व नियतच नव्हती. कारण जनगणनेतून येणारे आकडे आपल्याला गैरसोयीचे ठरतील अशी बहुदा सरकारला भीती वाटत असावी. आता तब्बल पाच वर्ष उशिरा ही गणना सुरु करण्यात येणार आहे. मधल्या काळात गणना का होत नाही याबद्दल आणि आता ती इतक्या उशिरा का सुरु होत आहे याबद्दल कोणतेही स्पष्टीकरण सरकारने दिलेले नाही. जनतेला किंवा माध्यमांना आपण काही उत्तरे देणे लागतो असे या सरकारला वाटतच नाही. निवडणुकीत जिंकलो म्हणजे या देशाचे राजे झालो, आपण वाट्टेल तसे वागू असा या सरकारचा दृष्टिकोन आहे. असो. जनगणना ही देशाबाबतची खरीखुरी आकडेवारी कळण्याचा एकमेव मार्ग आहे. देशातील प्रत्येक मनुष्याची गणना दुसऱ्या कोणत्याही कार्यक्रमात होत नाही व ती करण्याची क्षमता सरकार सोडून दुसऱ्या कोणत्याही संस्थेत वा कंपनीत नाही. काही जाहिरात कंपन्या किंवा प्रचार कंपन्या अधूनमधून जनतेची सर्वेक्षणे करतात. पण त्या काही लाख वा फार तर काही कोटी लोकांकडून माहिती घेतात वा त्यांना मते विचारतात आणि नंतर त्यांचे निष्कर्ष हेच पूर्ण देशाचे निष्कर्ष म्हणून प्रसारित करतात. जनगणना ही देशातील प्रत्येक घरात, झोपडीत किंवा अगदी उघड्या माळरानावर वा शहरातील फूटपाथवर राहणाऱ्या लोकांपर्यंत पोचणारी व्यवस्था आहे.

## माहिती हेच नवे सोने

आज डिजिटल युगात डेटा नावाच्या प्रकाराला अतोनात महत्व आलेले आहे. देशातील सर्वात श्रीमंत गृहस्थ मुकेश अंबानी मध्यंतरी म्हणाले होते की डेटा इज ए न्यू ऑईल. म्हणजेच आता डेटा हा संपत्तीचा नवा खजिना आहे. सध्या हा डेटा मुकेशभाई आणि त्यांच्यासारखी मित्रमंडळी तुमच्या आमच्या फोनमधून जमा करतात. आपण किती वेळा कुठली खरेदी केली, कुठून कुठे प्रवास केला, कोणाशी किती वेळ बोललो इत्यादी माहिती आपल्या मोबाईल फोनमधून मिळत राहते. कारण, आपण ऑनलाईन पेमेंट करतो, समजा नवीन मिक्सर किंवा टीव्ही हवा असेल तर त्याची माहिती आधी इंटरनेटवर शोधतो, यूट्यूबवर घरे किंवा जमिनी विकणाऱ्या एजंटांचे व्हिडिओ पाहतो. किंवा आजार झाला असेल तर त्याच्याशी संबधित डॉक्टर वगैरेंचा शोध नेटवरून घेतो. यातून आपण कोणत्या स्तरातील व्यक्ती आहोत व काय विचार करतो याचा अंदाज बांधता येऊ शकतो. पण यामध्ये दोन अडचणी आहेत. एक म्हणजे अजूनही बहुसंख्य लोक इंटरनेटचा वापर रील्स वगैरे पाहण्यापुरताच करतात. खरेद्या किंवा वस्तूंचा शोध वगैरे ते प्रत्यक्ष दुकानात जाऊन किंवा दुकानदारांना भेटूनच करतात. असंख्य लोकांकडे स्मार्ट फोनही अजून नाहीत. किंवा रिचार्ज महाग असल्याने ते फारसा वापरत नाहीत. दुसरे म्हणजे वर म्हटलेला डेटा हा बराचसा शहरी भागातला असतो. पण आजही बहुतांश भारत हा खेड्यापाड्यांमध्ये राहतो. तिथले व्यवहार अजूनही शंभर वर्षांपूर्वीसारखे होतात. त्यामुळे इंटरनेट इत्यादींमुळे अमेरिकेतल्या लोकांची जवळपास शंभर टक्के माहिती गोळा होत असेल. पण भारतात अजून तरी ते शक्य नाही. त्या दृष्टीने जनगणनेसारखा मोठा कार्यक्रम हाच भरवशाचा व उपयोगी आहे. जनगणना ही दोन किंवा तीन टप्प्यात होते. प्रारंभी कुटुंबातील सर्व सदस्यांची नावे, पत्ते, घर नंबर इत्यादी गोळा केले जाते. दुसऱ्या टप्प्यात नोकरी, धंदा, उत्पन्न, घरात कोणत्या वस्तू आहेत वा नाहीत, आर्थिक स्थिती इत्यादीबाबत माहिती गोळा केली जाते.

## जातींची गणना

याच माहितीमुळे आपल्याला खरे चित्र कळू शकते. मोदी प्रचार करतात त्याप्रमाणे देशातील गरिबी खरेच संपत चालली आहे का, घराघरात पाणी पोचले आहे का, शंभर टक्के घरांना वीज पोचली आहे का या गोष्टी या आकडेवारीमुळेच कळू शकतील. भारत हा खेड्यांचा देश आहे व शेती हा इथला मुख्य व्यवसाय आहे असा आजवरचा ठाम समज आहे. आता निव्वळ शेतीवर किती लोक खरेच अवलंबून आहेत, शहरीकरण किती वाढले आहे याचीही नेमकी आकडेवारी या गणनेमधूनच आपल्याला कळू शकेल. त्याच्या आधारे योजना आखणे हे सरकारला तर सोपे जातेच, पण खासगी कंपन्यांनाही आपली उत्पादने कोणत्या भागात विकायला हवीत याचा अंदाज येतो. त्यामुळे सरकारांपेक्षाही खासगी कंपन्या या जनगणनेच्या आकडेवारीची प्रतीक्षा अधिक करीत असतात व तिचा अधिक चांगला उपयोग ते करतात. जागतिक स्तरावर आपल्याला परकीय कर्ज मिळवणे किंवा आरोग्य वा पाणीपुरवठा योजनांसाठी मदत मिळवणे हे देखील या आकडेवारीच्या आधारे अधिक सुलभ होते. कारण, जागतिक बँक किंवा जागतिक आरोग्य संघटना सरकारी आकडेवारीच्या आधारेच आपली गणिते मांडतात व त्या आधारे मदत द्यायची की नाही हे ठरवतात. अनेकदा भारतात आता किती गरिबी आहे हे जागतिक बँकेतले तज्ज्ञ सांगतात. त्यांच्या निष्कर्षांचा व गणितांचा आधार हीदेखील सरकारी जनगणना हीच असते. त्यामुळेच गेल्या पाच वर्षात सरकारने जनगणना न करणे हा अक्षम्य अपराधच होता. आता उशिरा का होईना ही चूक सुधारली जात आहे हे ठीक आहे. दरम्यान यंदा जातींनिहाय गणना करावी अशी विरोधकांची मागणी होती. त्यामुळे लोकसंख्येत प्रत्येक जातींचे किती लोक आहेत हे कळेल असे सर्वांचे म्हणणे होते व ते खरे आहे. १९३१ नंतर या देशात जातनिहाय जनगणना झालेली नाही. आता या गणनेच्या दुसऱ्या टप्प्यात जातींची माहिती गोळा होणार असल्याचे सरकारने सांगितले आहे. त्यामुळे प्रत्येक कुटुंबाने आपली खरी जात सांगणे आवश्यक आहे. तसे झाले तर प्रत्येक जातगटाचे किती लोक एकूण लोकसंख्येत आहेत याचा अंदाज बांधता येईल. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाल्यास, सध्या राज्यात मराठे, ओबीसी इत्यादी किती आहेत याबाबत केवळ तर्क केले जातात. या गणनेमुळे त्यांच्यात ठोसपणा येऊ शकेल. यामुळे राखीव जागांच्या आंदोलनांनाही अधिक ठाम मागण्या करू शकतील. मात्र विरोधकांना याबाबत लक्ष ठेवून राहावे लागणार आहे. सरकारने ही माहिती गोळा करताना काही संदिग्धता ठेवू नये आणि लोकांनीही खोटी माहिती देऊ नये यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत.

विचार

# पीएम-वाणी: दूरदर्शी वायफाय प्रकल्प

***पीएम वाणी ही योजना म्हणजे संपूर्ण देशात अखंड इंटरनेट उपलब्ध करून देण्यासाठी तयार करण्यात आलेला सार्वजनिक वाय-फाय उपक्रम आहे. सार्वजनिक ठिकाणी विकेंद्रित वाय-फाय हॉटस्पॉट नेटवर्कच्या माध्यमातून इंटरनेट सेवा उपलब्ध करून देत डिजिटल दरी कमी करणे हा तिचा मुख्य उद्देश आहे. यातून लहान व्यावसायिक, दुकानदार यांना अतिरिक्त उत्पन्न मिळते. तसेच नागरिकांना स्वस्तात इंटरनेट उपलब्ध होते.***



**डॉ.दीपक शिकारपूर**

भारत डिजिटल क्षेत्रात वेगाने प्रगती करत आहे. शिक्षण, व्यापार, बँक व्यवहार, शासन सेवा, आरोग्य सेवा आणि दैनंदिन संवाद या सर्व क्षेत्रांमध्ये इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य नागरिकांना स्वस्त आणि सुलभ इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र सरकारने एक योजना सुरू केली. या योजनेचे पूर्ण नाव 'प्रधानमंत्री वाय-फाय प्रवेश जाळे' (पी एम वाणी) असे आहे. या योजनेची घोषणा सरकारने डिसेंबर २०२० मध्ये केली होती. ही योजना देशातील प्रत्येक नागरिकापर्यंत इंटरनेट सेवा पोहोचवण्याचा एक महत्त्वाचा प्रयत्न आहे. विशेषतः ग्रामीण भाग, लहान शहरे आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांना या योजनेमुळे मोठा फायदा होणार आहे. डिसेंबर २०२० मध्ये सुरू करण्यात आलेली ही योजना देशभरातील नागरिकांना, विशेषतः वंचित आणि ग्रामीण भागातील लोकांना, परवडण्याच्या, सहज उपलब्ध होण्याच्या आणि उच्च-गती इंटरनेट कनेक्टिव्हिटी देण्याच्या उद्देशाने राबवण्यात आली आहे. २०२६ पर्यंत या योजनेचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला असून ती भारताला डिजिटल समावेशक देश बनवण्याच्या उद्दिष्टाच्या अधिक जवळ घेऊन जात आहे. आजच्या काळात इंटरनेट ही केवळ चैनीची गोष्ट राहिली नसून मूलभूत गरज बनली आहे. विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिक्षण, शेतकऱ्यांना बाजारभावाची माहिती, लहान व्यावसायिकांना डिजिटल व्यवहार, नोकरी शोधणाऱ्यांना ऑनलाईन अर्ज अशा अनेक कामांसाठी इंटरनेट अत्यावश्यक आहे. परंतु देशातील अनेक भागांमध्ये इंटरनेट सेवा महाग किंवा अपुरी आहे. अनेक नागरिकांकडे महागड्या इंटरनेट योजना घेण्याची क्षमता नाही. या परिस्थितीत सार्वजनिक ठिकाणी स्वस्त दरात वाय-फाय सुविधा उपलब्ध करून देणे ही काळाची गरज होती. ही गरज ओळखून 'पीएम-वाणी' योजना राबवण्यात आली.

ही योजना म्हणजे संपूर्ण देशात अखंड इंटरनेट उपलब्ध करून देण्यासाठी आखण्यात आलेला सार्वजनिक वाय-फाय उपक्रम आहे. सार्वजनिक ठिकाणी विकेंद्रित वाय-फाय हॉटस्पॉट नेटवर्कच्या माध्यमातून इंटरनेट सेवा उपलब्ध करून देत डिजिटल दरी कमी करणे हा तिचा मुख्य उद्देश आहे. पारंपरिक मॉडेलप्रमाणे केवळ दूरसंचार कंपन्यांच्या नियंत्रणाखाली इंटरनेट सेवा न ठेवता लहान व्यावसायिक, चहाचे स्टॉल आणि स्थानिक उद्योजक यांच्यासारख्या स्थानिक घटकांना वाय-फाय ॲक्सेस पॉइंट उभारण्याची आणि सर्वसामान्यांना परवडणारी इंटरनेट सेवा देण्याची परवानगी दिली जाते. एखाद्या व्यक्तीला इंटरनेटचा वापर करायचा असेल तेव्हा ती व्यक्ती सुसंगत ॲपचा वापर करून जवळपास उपलब्ध असलेले वायफाय हॉटस्पॉट शोधू शकते, स्वतःची ओळख पडताळू शकते आणि योग्य डेटा प्लॅन निवडू शकते. संपूर्ण प्रक्रिया सोपी आणि वापरकर्ता-अनुकूल (युजर फ्रेंडली) पद्धतीने तयार करण्यात आली आहे. यामध्ये सुलभ पेमेंट पर्याय उपलब्ध आहेत. त्यामुळे वापरकर्ते अल्पकालीन इंटरनेट प्रवेशासाठी पैसे भरू शकतात. दीर्घकालीन ब्रॉडबँड योजनेची बांधिलकी नको असलेल्या लोकांसाठी हा पर्याय विशेषतः उपयुक्त ठरतो. या योजनेअंतर्गत लहान दुकानदार, चहा स्टॉल, किराणा दुकान, ग्रंथालय, शैक्षणिक संस्था इत्यादी ठिकाणी सार्वजनिक माहिती कार्यालये उघडता येतात. येथे वाय-फाय हॉटस्पॉट बसवून नागरिकांना इंटरनेट सेवा देता येते.

या योजनेचे मोठे वैशिष्ट्य म्हणजे लहान व्यावसायिकांना त्यासाठी वेगळा परवाना घेण्याची गरज नाही. त्यामुळे कोणीही छोटा उद्योजक सहज या योजनेत सहभागी होऊ शकतो. ही वाय-फाय सेवा अत्यंत स्वस्त दरात दिली जाऊ शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांना आणि गरीब नागरिकांना याचा मोठा लाभ होतो. या योजनेत सर्व माहिती कार्यालये आणि सेवा पुरवठादार यांची नोंदणी ऑनलाईन पद्धतीने केली जाते. त्यामुळे पारदर्शकता आणि सुलभता वाढते. ही योजना शहरांबरोबरच ग्रामीण भागातही राबवली जाते. त्यामुळे डिजिटल दरी कमी करण्यास मदत होते. या योजनेत सार्वजनिक माहिती कार्यालय, नोंदणी सेवा पुरवठादार आणि ॲप पुरवठादार हे तीन मुख्य घटक आहेत. सार्वजनिक माहिती कार्यालय वाय-फाय सेवा पुरवते. नोंदणी सेवा पुरवठादार सर्व कार्यालयांची माहिती ठेवतो. ॲप पुरवठादार ग्राहकांना इंटरनेट सेवा वापरण्यासाठी सुलभ ॲप उपलब्ध करून देतो. ही रचना सोपी आणि पारदर्शक आहे. त्यामुळे मोठ्या कंपन्यांवर अवलंबून न राहता लहान उद्योजकही डिजिटल सेवेत सहभागी होऊ शकतात. ही योजना सामान्य नागरिकांसाठी फायदेशीर ठरते. यात विद्यार्थ्यांना ऑनलाईन वर्ग, स्पर्धा परीक्षा तयारी आणि माहिती मिळवण्यासाठी स्वस्त दरात इंटरनेट उपलब्ध होते. लहान दुकानदार वाय-फाय सेवा देऊन अतिरिक्त उत्पन्न मिळवू शकतात. लोक ऑनलाईन बँकिंग, पैसे पाठवणे, वीज बिल भरणे, सरकारी सेवा वापरणे सहज करू शकतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठ्या शहरांतील विद्यार्थ्यांप्रमाणे शिक्षणाची समान संधी मिळते. महिला घरबसल्या ऑनलाईन व्यवसाय, शिक्षण आणि कौशल्य प्रशिक्षण घेऊ शकतात.

भारताची मोठी लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. या भागात इंटरनेट सुविधा कमी प्रमाणात उपलब्ध आहे. पीएम-वाणी योजनेमुळे गावोगावी वाय-फाय हॉटस्पॉट उभारले जाऊ शकतात. यामुळे शेतकऱ्यांना पीक विमा, हवामान अंदाज, बाजारभाव यांची माहिती वेळेवर मिळते. ग्रामीण युवक नोकरीसाठी ऑनलाईन अर्ज करू शकतात. स्वयंरोजगाराच्या संधी वाढतात. त्यामुळे गावांचा आर्थिक विकास होण्यास मदत होते. २०२६ पर्यंत देशाच्या विविध भागांमध्ये लाखो वायफाय हॉटस्पॉट उभारले गेले आहेत. त्यामुळे इंटरनेटची उपलब्धता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये पारंपरिक ब्रॉडबँड पायाभूत सुविधा अनेकदा अपुरी असतात. अशा ठिकाणी ही सुविधा विशेष लाभदायी ठरली आहे. नेटवर्कच्या विकेंद्रित स्वरूपामुळे केंद्रिय पायाभूत सुविधांवर मोठी गुंतवणूक न करता ही योजना जलद गतीने विस्तारू शकली आहे. या योजनेच्या विस्तारामुळे केवळ नागरिकांना कमी खर्चात इंटरनेट सेवा मिळण्यास मदत झाली, असे नाही तर सेवादेयक म्हणून नोंदणी केलेल्या लघु व्यवसाय मालकांनाही सक्षम केले आहे. अधिकाधिक उद्योजक या उपक्रमात सहभागी होत असल्याने योजनेचा विस्तार सतत वाढत आहे आणि परवडणाऱ्या इंटरनेट सेवांची मजबूत परिसंस्था निर्माण होत आहे. त्यामुळे शहरे आणि ग्रामीण भागांमधील डिजिटल दरी कमी करण्यास मदत करत आहे. केंद्र सरकारने डिजिटल भारत ही संकल्पना मांडली आहे. त्याचा उद्देश प्रत्येक नागरिकाला डिजिटल सेवा उपलब्ध करून देणे हा आहे. पीएम-वाणी योजना या संकल्पनेचा एक महत्त्वाचा भाग आहे.

डिजिटल भारतामुळे शासनाच्या सेवा ऑनलाईन झाल्या आहेत. आधार, पॅन, बँक खाते, शिष्यवृत्ती, निवडणूक नोंदणी अशा अनेक सेवा इंटरनेटद्वारे उपलब्ध आहेत. 'पीएम-वाणी'मुळे या सेवा अधिक लोकांपर्यंत पोहोचतील. ही योजना देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना देणारी आहे. इंटरनेट उपलब्ध झाल्याने ई-व्यापार वाढतो. लहान उद्योगांना आपली उत्पादने ऑनलाईन विकता येतात. डिजिटल व्यवहार वाढल्याने पारदर्शकता येते आणि भ्रष्टाचार कमी होण्यास मदत होते. लाखो लहान उद्योजक वाय-फाय हॉटस्पॉट चालवून उत्पन्न मिळवू शकतात. त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत होते. भविष्यात इंटरनेटचा वापर आणखी वाढणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑनलाईन आरोग्य सेवा, डिजिटल शिक्षण, दूरस्थ काम या क्षेत्रांमध्ये मोठ्या संधी आहेत. पीएम-वाणी योजना या सर्व क्षेत्रांना आधार देईल. भारत जगातील सर्वात मोठी डिजिटल अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. या प्रवासात पीएम-वाणी योजना महत्त्वाची भूमिका बजावेल. डिजिटल युगात प्रगती करण्यासाठी इंटरनेट ही मूलभूत गरज आहे. त्यामुळे पीएम-वाणी योजना ही भारताच्या उज्वल भविष्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे. योग्य अंमलबजावणी आणि जनसहभाग यामुळे ही योजना यशस्वी होईल आणि भारत डिजिटलदृष्ट्या सक्षम राष्ट्र बनेल.

चर्चा आजची

# अटल सेतू अलिबागकडे... पण?




**राकेश लोहार**

अटल सेतू हा देशातील सर्वात लांब सागरी सेतू म्हणून ओळखला जातो. आता हा सेतू थेट अलिबागशी जोडण्यात येणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबई-अलिबाग प्रवास अवघ्या दीड तासांवर येईल, असे सांगितले जाते. सिडकोमार्फत या प्रकल्पाचे काम सुरू असून, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, जेएनपीए बंदर आणि कोकण विभाग यांच्यात अखंड रस्ते संपर्क निर्माण करणे, हे यामागील प्रमुख उद्दिष्ट असल्याचे सांगण्यात येत आहे. सद्यःस्थिती पाहता हे लक्षात येते की, रस्ते, पूल, सेतू आणि महामार्ग उभारणीचा वेग वाढलेला दिसतो आणि त्यालाच 'विकास' असे नाव दिले जात आहे. परंतु, इथेच एक मूलभूत प्रश्न उभा राहतो की, विकास म्हणजे नेमके काय? केवळ भौतिक सुविधा उभारणे, प्रवासाचा वेळ कमी करणे आणि शहरांमधील अंतर जवळ आणणे म्हणजेच विकास आहे का? की विकासाची खरी व्याख्या अधिक व्यापक, अधिक मानवी आणि अधिक सर्वसमावेशक असायला हवी?

जर आपण रायगड जिल्हा याचा विचार केला, तर वास्तव वेगळे चित्र वेगळेच आहे. जिल्हा रुग्णालयांमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता आजही भासत आहे. आधुनिक वैद्यकीय सुविधा, तातडीची उपचार यंत्रणा या गोष्टींचा अभाव असल्याने गंभीर रुग्णांना मुंबईकडे हलवावे लागते. अनेक वेळा हा प्रवासच त्यांच्या जीवावर बेततो. अपघातग्रस्त असो वा गंभीर आजारी रुग्ण; स्थानिक पातळीवर सक्षम आरोग्यव्यवस्था नसल्यामुळे त्यांना मोठ्या शहरांवर अवलंबून राहावे लागते. अशा वेळी प्रश्न अधिक तीव्र होतो; तो म्हणजे, सेतू बांधून प्रवास जलद करणे अधिक महत्त्वाचे, की रुग्णालये सक्षम करून जीव वाचवणे? शिक्षणाच्या बाबतीतही परिस्थिती फार वेगळी नाही. रायगडमधील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी पुणे किंवा मुंबई गाठावी लागते. सर्वसामान्य कुटुंबांसाठी हे आर्थिकदृष्ट्या मोठे आव्हान ठरते. परिणामी, अनेक गुणवंत विद्यार्थ्यांची स्वप्ने अर्धवट राहतात. शिक्षणाची समान संधी हा प्रत्येकाचा अधिकार असताना, ती प्रत्यक्षात सर्वांपर्यंत पोहोचत नाही, ही वस्तुस्थिती चिंताजनक आहे. यामुळे केवळ व्यक्तींचेच नव्हे, तर संपूर्ण समाजाचे संभाव्य बौद्धिक नुकसान होत आहे. यातून ग्रामीण आणि शहरी भागातील दरी अधिक स्पष्ट होते. एका बाजूला शहरांमध्ये जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध आहेत, तर दुसऱ्या बाजूला ग्रामीण भागात मूलभूत गरजांसाठीही संघर्ष करावा लागतो. हा विरोधाभास विकासाच्या संकल्पनेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतो. विकासाचा खरा उद्देश लोकांच्या जीवनमानात सुधारणा करणे असतो, पण जर तो काही मर्यादित भागापुरताच राहिला, तर त्याला सर्वसमावेशक विकास म्हणता येईल का? कोकणासारख्या निसर्गसंपन्न भागात मोठ्या प्रमाणावर पायाभूत प्रकल्प राबवताना पर्यावरणीय समतोल राखणे ही मोठी जबाबदारी आहे. अन्यथा, अल्पकालीन विकासाच्या नावाखाली दीर्घकालीन नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जंगलतोड, जैवविविधतेवर परिणाम, किनारपट्टीवरील बदल, हे सर्व भविष्यात गंभीर समस्या निर्माण करू शकतात. याचबरोबर, या प्रकल्पांमधून स्थानिकांना रोजगाराच्या संधी कितपत मिळतात, हादेखील विचार करण्यासारखा मुद्दा आहे. अनेकदा असे प्रकल्प बाहेरील गुंतवणूकदार आणि मोठ्या कंपन्यांसाठी फायदेशीर ठरतात, तर स्थानिक नागरिकांना त्याचा थेट लाभ मर्यादित प्रमाणात मिळतो. स्थानिक तरुणांना योग्य प्रशिक्षण, कौशल्यविकास आणि रोजगाराच्या संधी दिल्या गेल्या नाहीत, तर विकासाचा लाभ त्यांच्या हातातून निसटण्याची शक्यता असते.

विकासाच्या नावाखाली वाढणारी आर्थिक असमानता हा आणखी एक चिंतेचा विषय आहे. काही लोकांना प्रचंड फायदा होतो, तर काही जण अधिकच मागे पडतात. त्यामुळे 'विकास' हा शब्द सर्वांसाठी समान अर्थाने लागू होत नाही. खरा विकास तोच, जो सर्वांना सोबत घेऊन पुढे जातो. आज गरज आहे ती समतोल विकासाची, जिथे पायाभूत सुविधा आणि मानवी गरजा यांचा समन्वय साधला जातो. रस्ते, पूल, सेतू हे नक्कीच आवश्यक आहेत, पण त्याचबरोबर रुग्णालये, शाळा, महाविद्यालये, आणि स्थानिक रोजगाराच्या संधी यांनाही तितकेच महत्त्व दिले पाहिजे. विकासाचा वेग जितका महत्त्वाचा आहे, तितकीच त्याची दिशा आणि गुणवत्ता महत्त्वाची आहे. अटल सेतूसारखे प्रकल्प प्रगतीचे प्रतीक असले, तरी तेच म्हणजे विकास नाही. जेव्हा सामान्य नागरिकाच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडतो, जेव्हा त्याला वेळेवर उपचार मिळतात, त्याच्या मुलांना चांगले शिक्षण मिळते, आणि त्याला आपल्या गावातच सन्मानाने जगण्याची संधी मिळते. शेवटी, एक साधा पण अत्यंत अर्थपूर्ण प्रश्न उरतो; तो म्हणजे, जर सेतू उभे राहिले, पण माणूसच मागे राहिला, तर त्या विकासाचा अर्थ काय? विकास हा फक्त अंतर कमी करण्यासाठी नसतो, तर माणसांमधील दरी कमी करण्यासाठी असतो. जर ही दरीच वाढत गेली, तर कितीही मोठे सेतू बांधले, तरी समाजाचा प्रवास अपूर्णच राहील.

लोकसंसद

## 'एप्रिल फूल'ची मस्करी जीवावर बेतू नये

पाश्च्यात्यांनी आपल्या डोक्यात आपल्या भारतीय संस्कृतीत नसलेले काही 'डे' साजरे करण्याचे जे काही खुळ घातले आहे त्यापैकीच एक म्हणजे एप्रिल फूल्स डे! अमेरिका, कॅनडा आणि युरोपसह अनेक देशात दरवर्षी १ एप्रिलला एप्रिल फूल्स डे हा दिवस गेली पाचशे वर्ष साजरा केला जात असून त्यामागे अनेक दंतकथा सांगितल्या जातात, मात्र त्याचे खरे मूळ कारण आजही अज्ञात आहे. खरे तर या दिवसाच्या निमित्ताने हलके फुलके विनोद करून, प्रॅन्क करून, खऱ्या वाटू शकणाऱ्या हलक्याफुलक्या खोट्या बातम्या किंवा माहिती देऊन एकमेकांची गंमत करायला काहीच हरकत नसावी. सध्याच्या ताणतणावाच्या दिवसात ते अपेक्षितच आहे. मात्र एप्रिल फूलच्या दिवशी कधी कधी जीवावर बेतणाऱ्या घटनाही घडतात. दोन वर्षांपूर्वी मध्य प्रदेशातील इंदूर येथील एका १८ वर्षीय युवकाने त्याच्या एका मित्राला एप्रिल फूल करण्यासाठी व्हिडिओ कॉल केला आणि गळफास घेऊन आत्महत्या करत असल्याचे सांगितले. मात्र त्याच्या दुर्दैवाने त्याचा आत्महत्या करण्याचा प्रँक अंगाशी आला आणि त्यात त्याने जीव गमावला. इतिहासात नोंदवली गेलेली 'एप्रिल फूल'ची सर्वात दुर्दैवी घटना म्हणजे १ एप्रिल १९४६ रोजी अमेरिकेच्या अलास्का राज्यातील अल्युशियन बेटांवर एका प्रचंड भूकंपानंतर महाभयंकर त्सुनामी आल्याचा एक खराखुरा इशारा जारी करण्यात आला होता. परंतु अलास्का येथील अनेक लोकांना हा इशारा म्हणजे 'एप्रिल फूल'ची मस्करी वाटली आणि त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले, परिणामी त्यात १६५ लोकांचा नाहक बळी गेला. त्यामुळे एप्रिल फूल्स डे' साजरा करताना याचेही भान असायला हवे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे**

दिनविशेष

# एप्रिल फुल

आज १ एप्रिल आजचा दिवस संपूर्ण दिवस जगात एप्रिल फुल म्हणून साजरा केला जातो. फुल म्हणजे मूर्ख. या दिवशी लोक एकमेकांना मूर्ख बनवतात. आपणही या दिवशी कोणाला तरी मूर्ख बनवलेच असेल. दुसऱ्याला मूर्ख बनवून एप्रिल फुल करण्याचा आनंद यापण सगळ्यांनीच लुटला असेल. एप्रिल फुल या प्रथेची सुरवात कधी झाली हे निश्चितपणे सांगता येणार नाही. याबाबत अनेक कथा प्रचलित आहे त्यातल्या एका फ्रेंच कथेनुसार पंधराव्या शतकात फ्रान्समध्ये ज्युलियन कॅलेंडर वापरत होते त्या कॅलेंडरप्रमाणे नववर्षाची सुरवात २५ मार्च ते १ एप्रिल या आठवड्यात होत असे. या आठवड्यात सगळे लोक वसंत ऋतूचे स्वागत आणि १ एप्रिलला नववर्ष साजरे करीत असत. मात्र १५८२ सालापासून फ्रेंच लोकांनी ग्रेगरियन कॅलेंडर स्वीकारले. या कॅलेंडर नुसार १ जानेवारीपासून पासून नववर्षाचा प्रारंभ होतो. हा बदल तेथील ग्रामीण भागातील अशिक्षित लोकांना माहीत नव्हता ते १ एप्रिलाच नववर्ष साजरा करीत त्यामुळे या लोकांना तेथील उच्चभ्रू , सुशिक्षित लोक मूर्ख म्हणत. जे लोक १ एप्रिलला नववर्ष साजरा करीत त्यांना फ्रांसमध्ये एप्रिल फुल असे संबोधले जाई. अशा तऱ्हेने १ एप्रिलला एप्रिल फुल करण्याची प्रथा जगभर पसरली. फ्रेंच लोक भारतात आल्यानंतर भारतातही ही प्रथा सुरू झाली. १ एप्रिलला आपले मित्र, नातेवाईक यांना एप्रिल फुल करण्याची प्रथा आता चांगलीच रुजली आहे. काळानुसार बदल होत आता लोक फेसबुक, व्हाट्सएप, ट्विटर या सोशल मीडियांच्या माध्यमातून एकमेकांना एप्रिल फुल करीत आहेत. आपल्या मित्रांना, नातेवाईकांना एप्रिल फुल करून त्यातून मिळणारा आनंद हा क्षणिक असला तरी तो आजच्या धकाधकीच्या जीवनात मोलाचा आहे. दुसऱ्यांना एप्रिल फुल बनवताना प्रत्येकाने स्वतःमधील वाईट प्रवृत्तीलाही एप्रिल फुल बनवावे. दररोज उशिरा उठण्याच्या सवयीला लवकर उठून व्यायाम करून एप्रिल फुल करावे. दररोज मोबाईल वापराच्या सवयीला एप्रिल फुल करून एखादे छानसे पुस्तक वाचावे. सर्वांशी जिव्हाळ्याने वागून आपल्यातील अहंकाराला एप्रिल फुल करावे. गरजवंताला मदत करून स्वार्थाला एप्रिलफुल करावे. मोठेपणाला एप्रिलफुल करून लहान मुलांशी खेळावे. स्वतःच्या मी पणाला एप्रिलफुल करुन आम्ही बनून समाजात वावरल्यास एकमेकांविषयी असलेली कटुता कमी होईल आणि प्रत्येकाला जीवनाचा आनंद घेता येईल. १ एप्रिलचा इतिहास बद्दल सांगायच झालं तर एप्रिल फूल डे बद्दल अनेक कथा प्रसिद्ध आहेत. असे म्हटले जाते की या दिवसाची सुरुवात १३८१ मध्ये झाली. त्या काळात राजा रिचर्ड जिंकला आणि बोहेमियाची राणी ॲनेने एक विचित्र घोषणा केली. त्यांनी सांगितले की दोघेही ३२ मार्च रोजी लग्न करणार आहेत. मग सुरुवातीला लोक आनंदी झाले पण नंतर त्यांना समजले की ३२ वी तारीख येणार नाही, म्हणजेच त्यांना फसवले जात आहे. तेव्हापासून १ मार्च रोजी मूर्ख दिन साजरा करण्यास सुरुवात झाली असे म्हटले जाते. काही कथांनुसार, तो १३९२ पासून साजरा केला जात आहे. दुसऱ्या एका कथेनुसार, प्राचीन युरोपमध्ये दरवर्षी १ एप्रिल रोजी नवीन वर्ष साजरे केले जात असे. १५८२ मध्ये पोप ग्रेगरी १३ ने नवीन दिनदर्शिका स्वीकारण्याच्या सूचना दिल्या ज्यामध्ये १ जानेवारीपासून नवीन वर्ष साजरे करण्यास सांगितले होते. रोममधील बहुतेक लोकांनी हे नवीन कॅलेंडर स्वीकारले, परंतु तरीही बरेच लोक १ एप्रिलला नवीन वर्ष मानतात. मग अशा लोकांना मूर्ख समजून त्यांची खरी हकीकत सांगितली. १९१५ मध्ये एका ब्रिटीश पायलटने जर्मनीतील लिले विमानतळावर मोठा बॉम्ब फेकला होता. हे पाहून लोक इकडे तिकडे धावू लागले, बराच वेळ लोक लपून राहिले. मात्र बराच वेळ होऊनही स्फोट न झाल्याने लोकांनी परत येऊन तो पाहिला. जिथे एप्रिल फूल लिहिलेला मोठा फुटबॉल होता.

**श्याम ठाणेदार**

# महाडमध्ये गॅस टंचाईचा फटका

**अनेक ठिकाणी व्यवसाय बंद ठेवण्याची वेळ**

## • हॉटेल-कॅटरर्स प्रांताधिकाऱ्यांच्या दारात

**| महाड | प्रतिनिधी |**

**आखाती देशांतील तणावपूर्ण परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या गॅस टंचाईचा फटका आता स्थानिक पातळीवरही तीव्रतेने जाणवू लागला आहे. महाड तालुक्यातील हॉटेल व्यवसायिक आणि कॅटरर्स यांच्यावर या टंचाईचे मोठे संकट कोसळले असून, अनेक ठिकाणी व्यवसाय बंद ठेवण्याची वेळ आली आहे. या पार्श्वभूमीवर संतप्त व्यावसायिकांनी प्रांताधिकाऱ्यांकडे धाव घेत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.**



महाडमधील हॉटेल व केटरर्स संघटनेच्या वतीने सोमवारी (दि.३०) मार्च रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयात प्रांताधिकारी पोपट ओमासे यांची भेट घेण्यात आली. यावेळी व्यावसायिकांनी आपल्या अडचणी मांडत किमान मर्यादित प्रमाणात तरी गॅस सिलेंडर उपलब्ध करून देण्याची मागणी केली. गॅस मिळाल्याशिवाय व्यवसाय सुरू ठेवणे अशक्य आहे, अन्यथा हॉटेल बंद ठेवावी लागतील, असा इशारा त्यांनी दिला.

काही भागात मर्यादित गॅस पुरवठा सुरू असल्याचे उदाहरण देत, महाडमध्येही तशीच व्यवस्था राबवावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. विशेषतः कॅटरिंग व्यावसायिकांची परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. लग्नसमारंभ व विविध कार्यक्रमांसाठी आधीच ऑर्डर्स घेतलेल्या असताना, गॅसअभावी सेवा देणे कठीण झाले आहे. पर्याय म्हणून चुलीवर स्वयंपाक करण्याचा प्रयत्न केला जात असला तरी अनेक सभागृह व्यवस्थापनांकडून त्याला परवानगी मिळत नाही. काही जण डिझेल भट्ट्यांचा वापर करत असले तरी इंधन मिळण्यातही अडचणी येत आहेत. पेट्रोल पंपांवर कॅन किंवा ड्रममध्ये डिझेल देण्यावरील निर्बंधांमुळे हा पर्यायही मर्यादित ठरत आहे. या गंभीर परिस्थितीवर उपाय म्हणून स्थानिक प्रशासनाने पुढाकार घेऊन किमान गॅस पुरवठा सुरू करावा, अशी मागणी संघटनेने केली. यावेळी संघटनेच्या वतीने प्रांताधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले असून, मोठ्या संख्येने पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

> जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे गॅस टंचाई भासत असून सध्या उपलब्ध गॅस प्राधान्याने रुग्णालये, वसतीगृहे, आश्रमशाळा आणि शासकीय योजनांसाठी वितरित केला जात आहे. परिस्थिती सुधारताच व्यावसायिकांसाठीही गॅस उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल.
> -पोपट ओमासे, प्रांताधिकारी

## निवडक



### माणगावात महावीर जयंती उत्साहात

माणगाव : माणगावात जैन समाज संघटनेतर्फे भगवान महावीर जयंती मंगळवारी (दि.३१) मार्च रोजी विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात माणगाव शहरातील जैन बांधव-भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यानिमित्त माणगाव शहरातून प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली. कचेरी रोड माणगाव येथील जैन मंदिरापासून या मिरवणुकीला सुरुवात होऊन मुंबई- गोवा महामार्गावरून बालाजी कॉम्पलेक्स येथून वळसा घेऊन पुन्हा जैन मंदिरात मिरवणुकीची सांगता करण्यात आली. त्यानंतर सायंकाळी भक्ती संध्याचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास रमेश जैन, मुकेश जैन, मुकेश जैन, संजय ओसवाल, ललित ओसवाल, मदनलाल जैन, सुरेश जैन, अशोक जैन, नरेश जैन, प्रवीण गांधी, प्रकाश मेहता, राजेश छेडा, संजय जैन, शांतीलाल जैन, महावीर जैन, राजू जैन, भरत जैन, पंकज जैन, जितेंद्र जैन, चिराग जैन, प्रथम जैन आदींसह माणगाव व गोरेगाव भागातील जैन समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महावीरांच्या मुर्तीची अभिषेक पूजा

**आगरदांडा** : जैन धर्मातील महान तीर्थंकराचा जन्मदिवस म्हणून महावीर जयंती साजरी केली जाते. मुरूड शहरातील जैन मंदिरात भगवान महावीरांच्या मुर्तीस अभिषेक पूजा आरती करुन भगवान महावीर जन्मकल्याणक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. तद्नंतर प्रतिमा सुवर्ण रथात विराजमान करण्यात आली. तद्नंतर भव्य मिरवणूक जैन मंदिरापासून विविध ठिकाणी फिरवण्यात आली. यावेळी जैन समाजाच्या महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. बेंजोच्या तालावर नाचत-गाजत मिरवणुक काढण्यात आली. यावेळी जागोजागी महिलांनी जैन विधी प्रमाणे सामया करुन भगवान महावीराची पुजा करण्यात आली. यावेळी मुरुड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



### बांबू व्यावसायिकांना आधार

**जिल्हाधिकारी किशन जावळे यांची उपस्थिती**

**रायगड** : पर्यावरण पुरक व्यावसाय म्हणून बांबू व्यावसायाकडे पाहिले जाते. हा व्यवसाय अधिक वृंध्दीगत करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेतला आहे. बांबूमार्फत परंपरागत हस्तकला काम करणाऱ्या अलिबाग तालुक्यातील ५० व्यक्तींना टूल्स कीटचे वाटप करण्यात आले. त्यामध्ये कटर, ड्रील मशीन आदी साहित्यांनी भरलेला कीट रायगडच्या जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते वाटप केले. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा उद्योग केंद्रातील हरालय्या, चंद्रशेखर सिंग, स्वप्ना राऊत आदींसह लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रीय हस्तकला विकास कार्यक्रमांतर्गत आयुक् हस्तकला कार्यालय वस्त्र मंत्रालय व भारत सरकार, महाराष्ट्र स्टेट हॅन्डलूम फेडरेशन लिमिटेडच्यावतीने अलिबाग तालुक्यातील नागाव, थळ, पोयनाड, रेवस, साळाव, रेवदंडा येथील लाभार्थ्यांना कीट वाटप करण्यात आले.



### माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**नवी मुंबई** : सिद्धार्थ कॉलेजमधून १९८८ ते १९९० या कालावधीमध्ये बी.कॉमची पदवी घेऊन बाहेर पडलेल्या माजी विद्यार्थ्यांचा शनिवारी (दि.२८) मार्च रोजी वानखेडे स्टेडियममधील गरवारे हॉलमध्ये सिद्धार्थ रियुनियन स्नेह मेळावा संपन्न झाला. यावेळी आ. प्रवीण दरेकर, आ. शशिकांत शिंदे, मुंबईचे उपमहापौर संजय घाडी, विठ्ठल लोकरे, विजय देसाई, प्रदीप दरेक आदींनी आपल्या कॉलेजचे नाव लौकिक केल्यामुळे त्यांचा सिद्धार्थ री युनियन कमिटी आणि प्राचार्य यांच्या हस्ते सिद्धार्थ रत्न देऊन गौरव करण्यात आला. यावेळी आ. दरेकर, आ. शशिकांत शिंदे यांनी महाविद्यालयाची महती सांगितली. यावेळी संतोष शेट्टी, सिद्धार्थ सालियन, बंटी म्हशीलकर, मनोज सावंत, प्राचार्य म्हस्के, ठोंबरे, कपाडिया, उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भाऊ नाटेकर, राजेश कदम, अरविंद गावडे आदींनी मेहनत घेतली. सिद्धार्थ साळवे यांनी सूत्रसंचलन केले. एकूण ७२ मित्र आणि मैत्रिणी उपस्थित होते.



## बॅटरीचलित फवारणी पंपाचे वितरण

**| कर्जत | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील नांदगाव ग्रामपंचायत येथील चेवणे गावातील एकूण ४१ शेतकऱ्यांना युनायटेड वे मुंबई संस्थेद्वारा कार्यान्वयित आणि UPS फाऊंडेशन अर्थसहाय्यित इकोनॉमीक एमपॉवरमेंट ऑफ फारमर्स इन कर्जत प्रकल्प अंतर्गत सोमवारी (दि.३०) मार्च रोजी सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन अंतर्गत निमअर्क, जीवामृत आदी सेंद्रिय निविष्ठा फवारण्यासाठी बॅटरीचलित फवारणी पंप वितरीत करण्यात आले. सदर कार्यक्रमात युनायटेड वे मुंबई संस्थेचे वरिष्ठ कृषी तज्ज्ञ जोएब दाऊदी यांनी चेवणे येथे गांडूळखत निर्मितीचे प्रात्यक्षिक उपस्थितांना दाखविले.

शेतकऱ्यांचे श्रम कमी करणे, सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देणे आणि हवामान बदलचे नकारात्मक परिणाम कमी करणे आणि शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे या उद्देशाने संस्था विविध उपक्रम सदर प्रकल्पात राबवीत आहे. सदर कार्यक्रम चेवणे गावात आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाची प्रस्तावना विवेक कोळी यांनी मांडली. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दीपक कवठे, प्रमोद धादवड यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास चेवणे, भोपळेवाडी, गोरेवाडी येथील ६७ नागरिक उपस्थित होते.

## पनवेलमधून वृद्ध महिला बेपत्ता

**पनवेल ग्रामीण** : कळंबोली गावातील राहणाऱ्या बेबी केशव परसे या वृद्ध महिला बेपत्ता झाल्याची घटना शुक्रवारी (दि.२७) रोजी घडली. त्या घर-ातून बाहेर पडल्या नंतर त्यांचा काहीही पत्ता लागलेला नाही. बेपत्ता होताना त्यांनी अंगात पिवळ्या रंगाची साडी लाल रंगाचा ब्लाऊज परिधान केला होता. त्यांच्या शोधासाठी कुटुंबीय आणि स्थानिक नागरिकांकडून प्रयत्न सुरू असून, संबंधित महिलेबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास तात्काळ कुटुंबीयांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी रुपेश परसे यांच्याशी ८८९८८२१२४४, ८२९१३२८२०८ किंवा ९३२४०००८६१ या क्रमांकांवर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## मुरुडमध्ये रक्तदान शिबिराला प्रतिसाद

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**



रूग्णांना वेळेत रक्त न मिळाल्याने अनेकांना आपला जीव गमवावा लागतो ही वस्तुस्थिती आहे. मात्र तालुक्यात अनेक रक्तदाते सामाजिक भान ठेवून कार्यरत आहेत आणि हे रक्तदातेच आपली खरी संपत्ती आहेत, असे प्रतिपादन डॉक्टर मयुर कल्याणी यांनी मुरूड श्रीराम नागरी पतसंस्था व अलिबाग मुरुड मेडिकल असोसिएशनच्यावतीने मुरुड कल्याणी हॉस्पीटल येथे आयोजित भव्य रक्तदान शिबिरामध्ये केले. कार्यक्रमाची सुरुवात श्रीराम नागरी पतसंस्था अध्यक्ष दिलीप जोशी, अभिषेक करुणाकार, डॉ. राज कल्याणी, डॉ. मंगेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आली.

यावेळी जंजिरा मेडिकल असोसिएशन मुरुडचे अध्यक्ष- डॉ. संजय पाटील, दिलीप जोशी, मेघराज जाधव, तटरक्षक, कार्यकारी अधिकारी अभिषेक करुणाकार, पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, बाळकृष्ण कासार, डॉ. राज कल्याणी, डॉ. मंगेश पाटील, समिर उपाध्ये, उमेश भायदे, निकेतन मसाल, कौस्तुभ जोशी, सुनील पटेल, डॉ. दिपक गोसावी, मधुकर वाघरे, नंदिनी ठाकुर, अमित सुर्वे, अंकेश पाटील, डॉ. अंनत जोशी, डॉ. वसीम पेशामाम, डॉ. शकील परदेशी, सुनील विरकुड, प्राजक्ता माळी, डॉ. अमित बेनकर, जी मोहन, विपीन तीवारी, दिपंकर मोडक, संजय विश्वकर्मा, गजेंद्र सिंह पैध आदिंसह रक्तदाते व मान्यवर उपस्थित होते. भारतीय तटरक्षक दलाचे तटरक्षक, कार्यकारी अधिकारी अभिषेक करुणाकारांच्या पत्नीसह २१ जवानांनी रक्तदान केले. या शिबीरात १०० रक्तदात्यांनी रक्तदान केले. अलिबाग मुरुड मेडिकल असोसिएशन, मुरुड कल्याणी हॉस्पीटल व श्रीराम नागरी पतसंस्थाच्या वतीने प्रत्येक रक्तदात्यास भेटवस्तू व राज्य रक्त संक्रमण परिषद महाराष्ट्र राज्य प्रमाणपत्र देण्यात आले.

## धावीर महाराजांना पोलीसांची मानवंदना



**| म्हसळा | प्रतिनिधी |**

म्हसळ्याचे जागृत ग्राम दैवत श्रीधावीर महाराजांची यात्रा बुधवार (दि. १) एप्रिल रोजी संपन्न होत आहे. दरवर्षी चैत्र पौर्णिमेला धावीर महाराजांच्या यात्रेचे आयोजन करून शहरातील वतनदार, सालकरी, मानकरी, कुलकर्णी आणि शहरातील सर्व ग्रामस्थ मोठ्या भक्ती भावाने, श्रद्धेने मुळ ठिकाणी आणले जातात. म्हसळ्यातील धावीर महाराजांच्या यात्रेपासून तालुक्यातील इतर यात्रांना सुरुवात होते. तालुक्यातील ८४ गावांतील भाविक यात्रेत मोठ्या उत्साहात सहभागी होतात. पूर्वी तालुक्यातील ३५ ते ४० गावातून काठ्या यात्रेला येत असत. मात्र, झपाट्याने होणारे शहरीकरणामुळे येणाऱ्या काठ्या खूप कमी येऊ लागल्या आहेत. गेल्या काही वर्षापासून केवळ १५ ते २० गावातील काठ्या यात्रेत सहभागी होतात.

संपूर्ण यात्रेची कायदा आणि सुव्यवस्था म्हसळा पोलीस ठाण्याकडून चोख बजावली जाते. येणाऱ्या सर्व यात्रेकरुंसाठी रात्रभर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था म्हसळा जैन समाज संघटनेकडून गेली कित्येक वर्षे केली जाते. खा. सुनिल तटकरे, आदिती तटकरे, अनिकेत तटकरे यांच्या प्रयत्नाने गेल्या दोन वर्षापासून पोलीस दलातर्फे पालखीस सलामी दिली जात आहे. यावर्षी धावीर महाराज पालखीस (दि.२) मार्च रोजी सायंकाळी ५. ३० वा. खा. सुनिल तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत रायगड पोलीस दलातर्फे पोलीस बँड पथकासह मानवंदना (सलामी) दिली जाणार आहे.

## मुरुडमध्ये शोभायात्रेने वेधले लक्ष



**| मुरुड जंजिरा | प्रतिनिधी |**

जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीरांच्या जन्मोत्सवाचे औचित्य साधून मुरुड शहरात महावीर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त भव्य शोभायात्रेने शहरात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते. फुलांनी सजवलेल्या रथातून भगवान महावीरांच्या सुवर्णमयी मूर्तीची नगरपरिक्रमा काढण्यात आली होती.

रथाला फुलांच्या माळांनी सजवण्यात आले होते. मुरुड पोलीस निरीक्षक कांबळे यांनी महावीर जयंतीनिमित्त सर्व जैन बांधवांना शुभेच्छा दिल्या. महिलांनी पारंपारिक वेशभूषा परिधान करून त्रिशला नंदन वीर की, जय बोलो महावीर की अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला होता. पुरुष भाविकांनी पांढऱ्या वेशभूषेत मिरवणुकीची शोभा वाढवली. 'जिओ और जीने दो' (जगा आणि जगू द्या) हा महावीरांचा शांततेचा संदेश या माध्यमातून पोहोचवण्यात आला.

## संजय वढावकर यांचा सत्कार

धाटाव : रोहा तालुक्यातील धाटाव औद्योगिक वसाहती मधील रंगनिर्मिती क्षेत्रात अग्रेसर असलेल्या निलिकॉन फूड डाइस अ‍ॅण्ड केमिकल कंपनीतील कामगारांचा मासिक वेतन वाढ व इतर सुविधा देण्याबाबतचा करार करण्यात यशस्वी झाला. त्यानिमित्ताने निलिकॉन कंपनीच्या कामगारांच्या वतीने कामगार नेते संजय वढावकर यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास शामकांत जोशी, जगदीश उपाध्ये, सुहास खरिवले, प्रशांत शेट्ये भरत कोतवाल, मंगेश कदम, तुषार देशमुख, भाऊ मोरे, शामकांत जोशी उपस्थित होते.

## पीएनपी महाविद्यालयात सायबर सिक्युरिटी विषयावर मार्गदर्शन

**| अलिबाग | प्रतिनिधी |**



प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीचे आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, वेश्वी, अलिबाग येथे सायबर सिक्युरिटी या विषयावर फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचा उद्देश डिजिटल युगातील सायबर सुरक्षेचे महत्त्व अधोरेखित करणे हा होता. या कार्यक्रमात प्रमुख मान्यवर व वक्ते म्हणून अनेक वर्षे सायबर सिक्युरिटी क्षेत्रामध्ये संशोधन करणारे तज्ज्ञ कुमार गौरव यांनी महाविद्यालयातील शिक्षकांना मार्गदर्शनपर प्रशिक्षण दिले. त्यांनी सायबर सिक्युरिटी संदर्भात उपयुक्त माहिती व व्यावहारिक अनुभव प्रेझेंटेशनद्वारे प्राध्यापकांसमोर मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी सायबर जागरूकतेचे महत्त्व अधोरेखित केले, तसेच आधुनिक तंत्रज्ञानाशी सुसंगत राहण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमांकरिता महाविद्यालयातील डॉ. नम्रता पाटील, डॉ. रसिका म्हात्रे, प्रा. पूजा म्हात्रे, प्रा. वृषाली घरत, डॉ. अमृता कुमारी शुक्ला आधी विभाग प्रमुख तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उस्फूर्तपणे सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. कैलाससिंह राजपूत यांनी मानले.

**बागमळा येथे १००वे रक्तदान पूर्ण | कुटुंबासह समाजसेवेचा आदर्श**

## रक्तदानाचा शतकवीर! संदेश बेडेकर यांचा प्रेरणादायी प्रवास

**| चौल | प्रतिनिधी |**



अलिबाग तालुक्यातील रेवदंडा येथील ६३ वर्षीय संदेश बेडेकर यांनी बागमळा येथे आयोजित रक्तदान शिबिरात शंभरावे रक्तदान करत एक प्रेरणादायी टप्पा गाठला आहे. आझाद मित्रमंडळाच्या १७ व्या रक्तदान शिबिरात त्यांनी ही उल्लेखनीय कामगिरी पूर्ण करत समाजासमोर आदर्श निर्माण केला.

वयाच्या अवघ्या १९ व्या वर्षी रक्तदानास सुरुवात केलेल्या बेडेकर यांनी गेल्या अनेक दशकांत सातत्याने रक्तदान करत 'सर्वश्रेष्ठ दान' जपले आहे. त्यांच्या या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, नव्या पिढीने त्यांच्याकडून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन आझाद मित्रमंडळाचे अध्यक्ष सुचिन घरत आणि राजेंद्र घरत यांनी केले.

हिंदू नववर्षाच्या निमित्ताने दरवर्षी बागमळा येथे आयोजित होणाऱ्या रक्तदान शिबिराला यंदा १७ वर्षे पूर्ण झाली.

यंदाच्या शिबिराचे मुख्य आकर्षण ठरले ते संदेश बेडेकर यांचे शंभरावे रक्तदान. यावेळी मंडळातर्फे त्यांचा शाल, पुष्पगुच्छ आणि श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्या मुलगी सुरुची बेडेकर हिनेही आतापर्यंत ९ वेळा रक्तदान करत कुटुंबाची परंपरा पुढे चालवली आहे. संपूर्ण कुटुंब समाजसेवेसाठी समर्पित असल्याचा अभिमान त्यांनी व्यक्त केला.

अलिबाग तालुक्यात शंभर वेळा रक्तदान करणारे बेडेकर हे एकमेव असल्याचा गौरव मंडळाने केला. त्यांच्या कार्यातून तरुणांनी प्रेरणा घेऊन रक्तदानास पुढे यावे, असेही आवाहन करण्यात आले.

दरम्यान, बेडेकर यांचा जीवनप्रवासही तितकाच प्रेरणादायी आहे. सुरुवातीच्या काळात त्यांनी कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी रिक्षा चालवली, तर सध्या ते टेलरिंग व्यवसाय करत आहेत. रिक्षा चालवत असताना त्यांनी कधीही गरजूंची अडवणूक न करता, मिळेल त्या भाड्यात समाधान मानत सेवा दिल्याचे ते सांगतात.

समाजासाठी निस्वार्थ भावनेने कार्य करणारे बेडेकर हे आज खऱ्या अर्थाने 'रक्तदानाचे शतकवीर' ठरले आहेत.

> **१९८५ साली मी प्रथम रक्तदान केले. माझ्या या सेवाभावी प्रवासात पत्नी मेघाची सुध्दा मोलाची साथ लाभली असून, तिने ही ३२ वेळा रक्तदान केले आहे.**
> **-संदेश बेडेकर**

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **झिराड आणि मांडवा येथील** दुकानात पीकअप आशयर व ४०७ वर ड्रायवर हवे आहेत. संपर्क - ८००७८९३२३२
- **बागायती वाडी विक्री १३ गुंठे** (घर, नारळ, सुपारी, विहीर) @२२ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक- सुहास माळी गाव- थळ गुंजाळ आळी, अलिबाग. रिसॉर्टसाठी योग्य जागा. मो. ८७७९८०५३५३
- **अलिबागमध्ये दुकान गाळा व अलिबागपासून** दोन-तीन किमी अंतरावर २२ गुंठे जागा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९
- **रेडस्टोन हॉलिडे होम अँड स्पा या** रिसॉर्टसाठी वेटर आणि हाऊसकिपींग या कामासाठी पुरूष कामगार हवे आहेत. राहण्याची व जेवण्याची व्यवस्था केली जाईल. पगार -१३००० रूपये **संपर्क** : ७७९८२४१०४०
- ***JOB VACANCY*** अलिबागमधे दवाखान्यामध्ये कामाला नर्स/रिसेपशनिस्ट पाहिजे. अधिक माहितीसाठी संपर्क करा. ८८०६१८४३०२

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि.रायगड)

ज.म.र. अर्ज ३७४/२०२४

## जाहिर नोटीस

प्रति,
श्री. आदेश कमलाकर शेडगे, अर्जदार
रा. चोरढे, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड
विरुध्द
ग्रामसेवक
ग्रुप ग्राम पंचायत चोरढे, सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार आजोबा कै. रामा जानु शेडगे, यांचा मृत्यु दि, २०/०५/१९८७ रोजी राहत्या घरी मौजे चोरढे, ता.मुरुड-जंजिरा जि. रायगड येथे झाला आहे, त्यांच्या मृत्युची नोंद ग्रुप ग्रामपंचायत चोरढे यांचे जन्म मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे मृत्यु नोंदीचे आदेश मिळणेकरिता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, कै. रामा जानु शेडगे, यांचा मृत्यु दि. २०/०५/१९८७ रोजी रोजी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे, न्यायालयांत दि. ०८/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये मृत्युची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १८/०३/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे
**सही/-**
**(आदेश डफल)**
**तहसिलदार मुरुड जंजिरा**

---

## जाहीर नोटीस

मे.तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो. माणगाव यांचे न्यायालयात
ज. नों. प्रस्ताव क्र. ११७/२०२६

१. अमानुल्ला मोहम्मद जाफर घनसे, अर्जदार
रा. मोर्बा ता. माणगाव, जि. रायगड
विरुद्ध
१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
मोर्बा, ग्रामपंचायत मोर्बा,
ता. माणगाव, जि. रायगड सामनेवाले
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव
जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळिवण्यात येते की,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, निबंधक जन्म-मृत्यू- विवाह नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा, ता. माणगाव यांचेकडील जन्म मृत्यू अधिनियम, १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ अन्वये या कार्यालयाकडे विलंबाने जन्म नोंद होणेकामी प्रस्ताव जा. क्र. ४५६/२०२६, दि. ०१/०१/२०२६ दाखल झाला आहे. त्यान्वये त्यांनी अमानुल्ला मोहम्मद जाफर धनसे, रा. मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. ०५/१०/१९५७ रोजी मौजे मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असल्याचे नमूद केले आहे.

अमानुल्ला मोहम्मद जाफर धनसे, रा. मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. ०५/१०/१९५७ रोजी मौजे मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असून त्यांना जन्म प्रमाणपत्र आवश्यक होते. परंतु सदर नोंद ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड यांचे अभिलेखामध्ये आढळून आलेली नाही. त्यामुळे निबंधक जन्म- मृत्यू- विवाह नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा, ता. माणगाव यांनी त्यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी आदेश मिळणेबाबत प्रस्ताव दाखल केला आहे.

तसेच अमानुल्ला मोहम्मद जाफर धनसे, रा. मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी निबंधक जन्म-मृत्यू नोंदणी, ग्रामपंचायत मोर्बा यांचेकडील प्रस्तावही या कार्यालयास प्राप्त झाला आहे. तरी सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता पंधरा दिवसांचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अमानुल्ला मोहम्मद जाफर धनसे, रा. मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. ०५/१०/१९५७ रोजी मौजे मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून त्यांच्या जन्माची नोंद होणेबाबत आदेश देण्यात येईल.

ठिकाण: माणगाव सही/-
दिनांक : २०/०३/२०२६ **(विपीन लोकरे)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार माणगाव**

---

## जाहीर नोटीस

मे.तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो. माणगाव यांचे न्यायालयात
ज. नों. प्रस्ताव क्र. ११८/२०२६

१. मोहम्मद हनीफ शेख अहमद बंदरकर अर्जदार
रा. मोर्बा ता. माणगाव, जि. रायगड
विरुद्ध
१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
मोर्बा, ग्रामपंचायत मोर्बा,
ता. माणगाव, जि. रायगड सामनेवाले
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव
जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळिवण्यात येते की,

